**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**अर्धा-तास चर्चा**

**तालिका सभापती** : आज कामकाज पत्रिकेवर 12 अर्धा-तास चर्चा दाखविलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की त्यांनी मुद्देसूद व थोडक्यात विषय मांडला तर सर्वांना न्याय मिळू शकेल. यानंतर अनुक्रमांक 2 वरील अर्धा-तास चर्चा प्रथम घेण्यात येईल.

**पृ.शी.**: मंत्रालयास लागलेल्या भीषण आगीनंतर शासनाने केलेल्या उपाययोजना

**मु.शी.**: मंत्रालयास लागलेल्या भीषण आगीनंतर शासनाने केलेल्या उपाययोजना या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 34333 ला दिनांक 18 डिसेंबर, 2012 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, "मंत्रालयास लागलेल्या भीषण आगीनंतर शासनाने केलेल्या उपाययोजना" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 34333 ला दिनांक 18 डिसेंबर, 2012 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, मंत्रालयास लागलेल्या भीषण आगीच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण पोटे-पाटील आणि अन्य सदस्यांनी 18 डिसेंबर, 2012 रोजी नागपूर येथील अधिवेशनात एक तारांकित प्रश्न उपस्थित केलेला होता. त्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये सरकारने काही आश्वासने दिलेली होती. त्या आश्वासनांच्या संदर्भात काय प्रतिपूर्ती झाली आहे याचा विचार करीत असताना परत 14 जानेवारी, 2013 रोजी मंत्रालयाला लाग लागल्याच्या संदर्भात माहिती समोर आलेली आहे. या संदर्भात माझे काही प्रश्न आहेत त्याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

सभापती महोदय, 1 ऑगस्ट, 2012 ला मंत्रिमंडळाची बैठक झाली होती त्यामध्ये 81.64 कोटी रुपयांच्या खर्चाला मान्यता देण्यात आली होती. तो निधी प्राप्त होऊन किती प्रमाणात कामाला सुरुवात झालेली आहे ? मंत्रालयाला आग लागली त्यावेळी सरकारने अनेक घोषणा केल्या होत्या. मंत्रालयामध्ये आग प्रतिबंधक अधिकारी व स्टाफ किती आहे याचा विचार झाला त्यावेळी असे लक्षात आले की, त्या ठिकाणी फार थोड्या प्रमाणामध्ये फक्त होमगार्डच्या संदर्भातील काही स्टाफ आहे आणि तोच स्टाफ आग प्रतिबंधक कक्षामध्ये काम करतो. त्यांचे मुख्य अधिकारी रजेवर होते. ती जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे, सामान्य प्रशासन विभागाची आहे की गृह विभागाची आहे, नक्की कोणाची जबाबादारी आहे याबद्दल बरीचशी तपशीलवार चर्चा झाली होती. आता मंत्रालयाच्या आगीच्या संदर्भात कोणत्या अधिकाऱ्यावर जबाबदारी टाकलेली आहे ?

सभापती महोदय, आगीमध्ये अनेक फाईल्स जळाल्या. आम्ही विविध समित्यांमध्ये कामकाज करीत असताना विचारणा करतो तेव्हा फाईल्स जळालेल्या असल्यामुळे त्यांची दुरुस्ती फाईल मागविण्याचे काम चालू आहे असे उत्तर दिले जाते. आता मंत्रालयामध्ये आताच्या कामकाजामध्ये फाईल्स सुरक्षित राहाव्यात म्हणून आग प्रतिबंधक उपाययोजनेचा काय उपयोग करुन घेतो याकडे मला लक्ष वेधावेसे वाटते. मंत्रालयाचा आग प्रतिबंधक विमा उतरविला आहे का, नसल्यास आग प्रतिबंधक विमा आतापर्यंत का उतरविला नाही ? सरकारने आधीच्या आगीच्या वेळी जरी विमा उतरविला असता तरी जानेवारीच्या आगीच्या वेळी सरकारला काही तरी मागता आले असते. सरकार स्वत:चे मंत्रालय, स्वत:ची कागदपत्रे सुरक्षित ठेऊ शकत नाही. अशा वेळी राज्यभर परत सूचना दिल्या जात आहेत की, तुम्ही आग प्रतिबंधक ड्रील घ्या, उपाययोजना करा. म्हणून या अर्धा-तास चर्चेमधून मी हे सर्व प्रश्न उपस्थित करीत आहे. या प्रश्नांबरोबरच 14 जानेवारीला जी आग लागली त्यामध्ये काय नुकसान झाले ? प्रत्येक वेळी शॉर्ट सर्कीटमुळे आग आली असे सांगितले जाते. श्री. देशमुख ज्यांनी आग प्रतिबंधक विषयामध्ये न्यूयॉर्कमध्ये काम केले आहे तसेच ते युनायटेड नेशनमध्ये सल्लागार होते त्यांनी अनेक वेळा असे मत व्यक्त केले आहे की, शॉर्ट सर्कीटमुळे आग लागली असे जे उत्तर देतो ते अशास्त्रीय आहे. कारण अलीकडे ज्या प्रकारच्या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

डॉ. नीलम गोऱ्हे ....

वायर्स वापरतो त्यामध्ये शॉर्ट सर्कीट झाले तर त्याच ठिकाणी ती आग विझेल आणि बाकीच्या सर्कीटमध्ये ती पसरणार नाही अशी उपाययोजना केलेली असते. कोठेही आग लागली विशेषत: सरकारी इमारतीला आग लागली की, शॉर्ट सर्कीटने आग लागली असे हुकमी कारण दिले जाते. या बाबतलीत पुढे काय उपाययोजना केली ? या चार-पाच प्रश्नांच्या संदर्भात माननीय मंत्र्यांनी स्पष्टीकरण करावे अशी मी या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने विनंती करते.

---

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, दिनांक 21 जून, 2012 रोजी मंत्रालयाला आग लागली होती त्यावेळी इन्शुरन्स उतरविलेला नव्हता. परंतु निश्चितपणे मंत्रालयाच्या इमारतीचा दरवर्षी इन्शुरन्स काढणार आहे. जोपर्यंत मंत्रालयाच्या इमारतीचे सातही मजले पूर्ण होत नाहीत तोपर्यंत इन्शुरन्स काढता येत नाही. या सातही मजल्यांचे काम पूर्ण होईल त्यावेळी इन्शुरन्स काढण्यात येईल.

फायर फायटिंगसाठी जे कर्मचारी होते ते कोणत्या विभागाच्या अंतर्गत येतात हा एक विषय होता. हा विषय सामान्य प्रशासन विभागाच्या अंतर्गत येतो. ते कोऑर्डिनेशन करणारे डिपार्टमेंट आहे. देखभाल व दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे आणि कर्मचाऱ्यांची बाब सामान्य प्रशासन विभागाकडे आहे. यावेळी मात्र एक इंटिग्रेटेड प्रोग्रॅम करीत आहोत. त्यामध्ये फायर फायटिंगची ॲटोमॅटिक सिस्टिम असेल. त्यामध्ये आतील व बाहेरील भागांचे फायर फायटिंग कसे केले पाहिजे त्याचेही नियोजन केलेले आहे. बेसिकली बिल्डिंग इंटिग्रेटेड मॅनेजमेण्ट सिस्टिम अशी ती कल्पना आहे. त्यात फायर अलार्मची सेंट्रल कंट्रोल सिस्टिम असेल, स्मोक डिटेक्शन सिस्टिम कंट्रोल असेल, स्प्रिंकलर, सीसीटीव्ही कॅमेरे, व्हिडिओ कॅमेरा व व्हिडिओ मॉनेटरिंग असणार आहे. स्मोक आले की ते इमिजिएट डिटेक्ट होऊन कंट्रोल रुम असते त्यांना त्याची माहिती होईल.

यापूर्वी पाण्याची एकच टाकी होती. आता पाण्याच्या 5 टाक्या असतील. आताचे जे कोर्ट यार्ड आहे ते जवळपास 8 मीटर खोल आहे. त्याचे बांधकाम सुरु आहे. त्यामध्ये 10 लाख लिटर पाणी स्टॅण्ड बाय ठेवलेले आहे आणि 7.5 लाख लिटर पाणी रेग्युलर फायर फायटिंगसाठी असेल. रेग्युलर युजसाठीही त्याचा वापर केला जाईल. तसेच मंत्रालयामध्ये पाण्याच्या टँकरची कायम स्वरुपी व्यवस्था केलेली आहे. आपत्कालीन व्यवस्था राहणार आहे. सीसीटीव्ही कॅमेरे असतील, पब्लिक एन्ट्रन्स सिस्टिम असेल, कोठे आग लागली तर संपूर्ण मंत्रालयामध्ये मायक्रोफोन सिस्टिमद्वारे त्याची माहिती देऊ शकतो. तसेच आत व बाहेर फायर एक्झिट रुटस् केलेले आहेत. स्टेअरकेस आहेत त्यामध्ये प्रेशराईज स्टेअरकेस करीत आहोत. त्यावेळी लागलेल्या आगीच्या वेळी लोक खाली येत होते. परंतु आगीच्या धुरामुळे लोकांना दिसत नव्हते. आता नवीन प्रकारच्या सोयीमुळे प्रेशराईज स्टेअरकेसमुळे लोक खाली येऊ शकतात. त्यामुळे लोकांना क्लिअर दिसेल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.रणजित कांबळे....

त्यात मोनोऑक्साईड नसल्यामुळे लोकांना शिडीवरुन खाली येताना स्पष्टपणे दिसेल. त्याशिवाय सिक्युरिटीची व्यवस्था केलेली आहे. हाऊस डाऊझिंग, पाईपद्वारे स्मोक डिटेक्टर्सची व्यवस्था केलेली आहे. बाहेरच्या बाजूसाठी फायर हायड्रण्ट, फायर ॲक्टिव्हेशन सिस्टिम लावलेली आहे. भविष्यामध्ये आग लागली तर निश्चितपणे माहिती होईल.

सन्माननीय सदस्यांनी वायरिंगचा मुद्दा मांडला आहे. सर्किट ब्रेकर्स सगळीकडे वापरली जाते. आता भिंतीच्या डक्समध्ये पाईप लाईन टाकून वायरिंग केली जाणार आहे. प्लायवुडचे पार्टिशन तयार केले जाते. त्यामुळे आग मोठ्या प्रमाणात पसरली होती असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता सिपोरेक्स ब्लॉकचा वापर केला जाईल. ते फार हलके असतात. ते आग प्रतिबंधक आहेत. त्यावेळच्या आगीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांची मंत्रिमंडळाची खोली जळाली नव्हती. कारण त्यामध्ये प्रॉपर वॉल होती. त्या आगीमध्ये अनेक फाईल्स जळाल्या आहेत. त्यांची रिकव्हरी करण्याचा प्रश्न होता. हा विषय जी.ए.डी.चा आहे, परंतु मला मिळालेल्या माहितीमुळे मी सांगतो. सामान्य प्रशासन विभागामार्फत स्कॅनिंगचे काम प्रगतीपथावर आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 10:10

श्री. रणजित कांबळे...

दुसरा सर्व्हर बाहेर असतो. जेवढया फाईल स्कॅन झाल्या होत्या त्या सेकंडरी सर्व्हरमध्ये आहेत. ज्या फाईल उपलब्ध नाहीत त्या पुन्हा तयार करण्याची गरज आहे. महसूल विभागाच्या फाईल्स पटवारी पासून तयार कराव्या लागतात.

डॉ. नीलम गो-हे : जानेवारी महिन्यामध्ये लागलेल्या आगीची कारणे काय आहेत ?

श्री. रणजित कांबळे : तेथे केमिकल ट्रिटमेण्टचे काम चालू होते आणि त्याच वेळी वेल्डिंगचे देखील काम चालू होते. वेल्डिंग करताना त्याठिकाणी ठिणगी पडल्यामुळे आग लागली. ती आग पाच मिनिटांमध्ये नियंत्रणात आणली. या बाबतीत काम करणा-या कामगारांगना केमिकल ट्रिटमेण्टचे काम केल्यानंतरच इतर कामे करण्यासंबंधी सक्त ताकीद देण्यात आलेली आहे.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पुणे शहरात स्त्रिया व मुली बेपत्ता होण्याच्या वाढलेल्या घटना

**मु. शी.** : पुणे शहरात स्त्रिया व मुली बेपत्ता होण्याच्या वाढलेल्या घटना यासंबंधी डॉ. नीलम गो-हे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते :-

"पुणे शहरात गेल्या वर्षभरात 1860 स्त्रिया तर 736 मुली बेपत्ता होण्याच्या घटना घडणे, या बेपत्ता झालेल्या व अपहरण केलेल्या बालकांना अत्यंत वाईट पध्दतीने वागविण्यात येत असून त्यापैकी काही मुलांकडून गैरकृत्ये करवून घेणे, काही मुलांना ठार मारुन त्यांच्या अवयवांचा व्यापार करणे, काही बालकांना दुस-या राज्यात विकणे, अशा प्रकारे बेपत्ता व अपहरण बालकांचे हाल होत असणे, शासनातर्फे बालकल्याणाचे अनेक कार्यक्रम राबविण्यात येत असणे, बेपत्ता होणा-या स्त्रिया, मुले व मुली यांचा तपास त्वरित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, हा संपूर्ण महाराष्ट्राचा विषय असला तरी खास करुन पुणे शहराच्या संदर्भात या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून मी माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधलेले आहे. महाराष्ट्रामध्ये पुणे,मुंबईसारखी मोठमोठी शहरे आहेत. एका बाजूला दहशतवादासारख्या धोक्याच्या रडारवर ही शहरे आहेत. तसेच संघटित गुन्हेगारी, शस्त्रास्त्रांची तस्करी, मानवी तस्करी या गोष्टी देखील मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. दुर्दैवाने पुणे शहर हे ट्रान्झिट पॉईंट झालेले आहे. येथून मुलींची मोठ्या प्रमाणावर ने-आण होते. असे असताना पोलिसांकडून हे शहर दुलर्क्षित राहिलेले आहे. पुणे शहर पोलीस, पुणे ग्रामीण पोलीस, पुण्याच्या आसपासच्या जिल्ह्यातील पोलीस यांच्यामध्ये समन्वय असण्याची गरज आहे. नगर जिल्हा हा उत्तर महाराष्ट्राच्या नाशिक आय.जी.च्या कार्यक्षेत्रामध्ये येतो. मागे कोठेवाडी येथे घडलेली घटना तसेच आता नुकतीच धुळे येथे घडलेली घटना आपणा सर्वांना माहीत आहे. पुणे शहरात ॲन्टीट्राफिकिंगचे अधिकारी कोण आहेत याची आम्हाला माहिती आहे. त्यामुळे मंत्री महोदयांकडून आम्हाला त्याच त्याच उत्तराची अपेक्षा नाही.

जे लोक दलाली करताना पुन्हा पुन्हा सापडलेले आहेत त्यांचा आढाचा शहरस्तरावर

..3..





डॉ. नीलम गो-हे...

घेणे गरजेचे आहे. रेल्वेस्टेशनवरुन मुली पुन्हा दुसरीकडे नेल्या जातात. रेल्वे पोलीस आणि पुणे शहर पोलीस यांच्यामध्ये समन्वय नाही. तसेच मुंबई-पुणे येथून जाणारे जे रस्ते आहेत त्या रस्त्यावर देखील संनियंत्रण व्हायला पाहिजे ते होत नाही. त्याचा परिणाम असा होतो की पुणे शहरामध्ये ज्या व्हल्नरेबल मुली आहेत, ज्या हॉस्पिटलमध्ये आलेल्या आहेत, चुकून आलेल्या आहेत, काही काळापुरत्या आलेल्या आहेत, या मुली देखील आज ना उद्या त्या व्यवसायामध्ये ढकलल्या गेल्याचे दिसून येते. याबाबतीत आपण जी उपाययोजना करतो त्यामध्ये संरक्षण आणि पुनर्वसन या दोन गोष्टी येतात. त्यांचे पुनर्वसन होईल. परंतु त्यांना तेथल्या तेथे संरक्षण देण्याची गरज आहे. त्यामुळे पुण्यातील सर्व बसस्टॅण्ड, रेल्वे स्टेशन या ठिकाणी त्यांना संरक्षण देण्यासाठी काय योजना तयार केलेली आहे यावर मंत्री महोदयांनी प्रकाश टाकला तर बरे होईल. तसेच बेपत्ता झालेल्या मुली, अपहरण झालेली बालके असतात. अपहरण झालेल्या बालकांना येरवडा येथील बालसुधार गृहात ठेवले जाते. तेथील मुलांनी पुन्हा पुन्हा पळून जाण्याच्या घटना घडलेल्या आहेत. मला वाटते की या सर्व घटनांच्या संदर्भात पुणे शहरामध्ये पोलिसांनी एक स्वत:ची समिती तयार करावी किंवा ॲण्टी ट्राफिकिंग प्रमाणे एखाद्या डीसीपी स्तरावरच्या अधिका-यांकडे ही जबाबदारी सोपवावी जेणेकरुन हद्दीच्या वादाच्या पलीकडे जाऊन सुरक्षिततेचा आढावा घेण्याच्या दृष्टीने त्याचा उपयोग होईल याकडे मला लक्ष वेधावेसे वाटते.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ प्रथम श्री.शिगम 10:15

डॉ.नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, पुणे शहर आयुक्तालयामार्फत बरेचसे कार्यक्रम अलिकच्या काळात घेत आहेत. पूणे येथे सी.आय.डी.महासंचालकांही कार्यालय आहे, त्यांच्या महानिरीक्षकांकडे ॲन्टी ट्राफिकिंगची जबाबदारी सोपविलेली आहे. मला असे वाटते की, पुणे शहरातील या कार्यालयांचा उपयोग यातील काही मुली सापडण्याच्या संदर्भात झाला तर खूपच चांगले होईल. पुणे व उर्वरित महाराष्ट्रातील बऱ्याचशा अल्पवयीन मुली दिल्ली आणि हैद्राबादच्या कुंटणखान्यात आहेत ही वास्तविकता आहे. ज्या ज्या वेळी दुष्काळ पडतो, त्यावेळी या अल्पवयीन मुली दुसऱ्या शहरातील कुंटणखान्यात विकल्या जातात. याबाबतीत पुणे शहराच्या बाबतीत शासनाने काय पाऊले उचललेली आहेत ? आज दुष्काळी भागातील लोंढे पुणे शहरात येऊ लागलेले आहे. या गोष्टीबाबत शासनाकडून केल्या गेलेल्या उपाययोजनेची माहिती सभागृहाला मिळावी म्हणून मी ही अर्धा तास चर्चेची सूचना उपस्थित केलेली आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, जी मुले आणि महिला सुधारगृहात ठेवल्या जातात, तेथील अवस्था चांगली नाही त्यामुळे महिला बालकल्याण विभागामार्फत या सुधारगृहांमध्ये सुधारणा व्हावी म्हणून विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत. आता पर्यंत ज्या मुली आणि महिला मिसिंग आहेत, शासनाच्या सूचनेप्रमाणे या संदर्भात पुणे पोलिस एक विशेष मोहिम राबवित आहे. दिनांक 8.1.2013 पासून 2162 नोंदी कमी केलेल्या आहेत. त्यातील बऱ्याच मुली, महिला अनेक कारणांमुळे बाहेर घराच्या पडल्या होत्या. त्यातील काही मुली व महिला त्यांच्या घरी परत आलेल्या आहेत. काही मुली व महिलांना शोधून पोलिसांना त्यांनी घरी पोहोचविण्याचे काम केले आहे. 2012 मध्ये 2602 पैकी 1847 महिला आणि मुलींचा शोध पोलिसांनी लावलेला आहे.

महोदय,कौटुंबीक कारणामुळे 910 महिला व मुली घर सोडून गेल्या होत्या. याचे साधारणतः प्रमाण 30 टक्के आहे. 510 मुली म्हणजे 20 टक्के मुली आपल्या प्रियकराबरोबर घर सोडून गेल्या होत्या. जीवनात नैराश्य आले म्हणून 5 टक्के म्हणजे 130 मुली व महिला घर सोडून गेल्या होत्या. वेडसरपणामुळे 5 टक्के, परीक्षेत अनुत्तीण झाल्याने 4 टक्के, आजारपणास कंटाळून 4.50 टक्के, परीक्षेचा अभ्यास न झाल्यामुळे 2 टक्के मुली, घरातील त्रास व आर्थिक अडचण या कारणांमुळे 24 टक्के मुली व महिला घर सोडून गेल्या होत्या. या विविध कारणांमुळे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ प्रथम श्री.शिगम 10:15

श्री.आर.आर.पाटील...

624 मुली व महिला घर सोडून गेल्या होत्या. या संदर्भात पोलिसांनी विशेष मोहिम राबवून 2012 मध्ये 627 बेपत्ता व्यक्तींचा शोध लावलेला आहे. पुणे शहरातून मुली व महिला मिसिंग होत आहेत, त्यांचा शोध घेण्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशनला 1 पी.एस.आय. 2 पोलीस कर्मचारी नेमले आहेत आणि याबाबतीत समन्वयासाठी 1 पोलीस इन्स्पेक्टर आणि 2 पोलीस कर्मचारी केवळ याच कामासाठी नेमण्यात आले आहेत. मुख्य डयुटी म्हणून त्यांच्याकडे हे काम सोपविलेले आहे. ज्यावेळी मिसिंगच्या तक्रारी होतात, त्या मिसिंग व्यक्तींचा शोध पोलीस घेत आहेत.

महोदय, मी एक गोष्ट लक्षात आणून देऊ इच्छितो की, मिसिंग म्हणून ज्या तक्रारी नोंद झालेल्या आहेत. त्यातील काही मुली व महिलांचा शोध लागलेला आहे, त्यातील एकही मुलगी अथवा महिला कुंटणखान्यासाठी पळवून नेण्यात आलेली नव्हती. मिसिंग झालेली मुलगी अथवा महिला यांना पळवूनच नेले आहे अशी परिस्थिती नाही. या ठिकाणी उल्लेख केला की, रेल्वे स्टेशन असले, बाकीचे ठिकाणाहून मुलींना पळवून नेले जाते. याकडे पोलीस संवेदनशीलपणे बघत आहेत. त्या भागात सी.सी.कॅमरे बसविणे, त्या ठिकाणी जास्तीचे कर्मचारी नेमून अशा गोष्टींवर लक्ष देण्यात येत आहे. हा आकडा मोठा दिसतो आहे. गेल्या दीड महिन्यातच अशा प्रकरणांची संख्या कमी झालेली आहे. मिसिंग झालेल्या व्यक्तींचा शोध घेण्याची ही विशेष मोहिम अशाच पध्दतीने चालू ठेवण्यात येईल.

------------

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SGB/ D/ ST/ गितेनंतर 10:20

**पृ. शी.** : मौजे मुरली तांडा (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथे गुप्त धन मिळविण्यासाठी खोदलेल्या खड्डयात बालिकेचा बळी देण्याची घटना उघडकीस येणे

**मु. शी.** : मौजे मुरली तांडा (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथे गुप्त धन मिळविण्यासाठी खोदलेल्या खड्डयात बालिकेचा बळी देण्याची घटना उघडकीस येणे यासंबंधी श्री.संदीप बाजोरिया,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री.संदीप बाजोरिया (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"मौजे मुरली तांडा (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील मारुती मंदिराजवळ गुप्त धनासाठी बालिकेचा बळी देण्यासाठी खड्डा खोदण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१३ मध्ये निदर्शनास येणे, अद्याप खेडोपाड्यात अंधश्रध्दा असून बालकांचा बळी देण्यात येत असणे, सदर घटनेत समाविष्ट असलेल्या संशयितांना पकडून पोलिसांच्या स्वाधीन करण्यात येवूनही त्यांच्यावर कोणतीच कारवाई करण्यात न येणे, परिणामी नागरिकांत पसरलेले भीतीचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी तालुक्यात दिनांक 17 नोव्हेंबर, 2012 रोजी घडलेली ही घटना आहे. आघाडी सरकारमधील ज्येष्ठ मंत्री यांचा हा मतदारसंघ आहे. त्यांनीच अंधश्रध्दा निर्मूलनासंबंधीचे विधेयक सभागृहात मंजुरीसाठी सादर केलेले आहे. त्यांच्या मतदारसंघातील ही अमानवी घटना घडलेली आहे. एका बालिकेचा नरबळी देण्याचा प्रयत्न झालेला आहे. मुरली तांडा येथे मारुती मंदिरासमोर दिनांक 17 नोव्हेंबर, 2012 रोजी मध्यरात्री ही घटना घडलेली आहे. घाटंजी पोलिसांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष दिलेले नाही. राजकीय दबावाखाली संबंधित मंत्र्यांच्या परिचयाचे असलेले जिल्हा परिषद सदस्य यांचे नाव या प्रकरणात गुंतलेले असताना त्यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई केली गेली नाही. या प्रकरणातील मुलगी 17 नोव्हेंबर, 2012 पासून आजतागायत बेपत्ता आहे. 15 दिवसांपूर्वी स्थानिक वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली की, ही मुलगी सुरक्षित आहे. बेपत्ता असलेली मुलगी सुरक्षित असेल तर ती कुठे आहे? पोलिसांनी तिला शोधून काढण्यासाठी आतापर्यंत कोणत्या मार्गाने तपास केला आहे?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संदीप बाजोरिया........

जे दोन आरोपी पकडण्यात आले त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करुन कारवाई केलेली नाही.

सभापती महोदय, जिल्हा परिषद सदस्यांच्या नावाने मोबाईल करुन आम्हाला वाचवा आणि या केसमधून सोडवा असे सांगण्याचा प्रकार आरोपींकडून घडलेला आहे. ही घटना घडल्यानंतर 15 दिवसात संबंधित मंत्र्यांनी त्या गावात मेळावा आयोजित केला होता. तो सरकारी मेळावा नव्हता. राजकीय पक्षामार्फत मेळावा आयोजित केलेला होता. त्या मेळाव्याला एस.पी., आयुक्त, जिल्हाधिकारी हजर होते. एस.पी.हे वर्दी घालून कार्यक्रमाला उपस्थित राहिले होते. संबंधित संशयित आरोपी असलेले जिल्हा परिषद सदस्य या कार्यक्रमाचे सूत्र संचालन करीत होते. अशा प्रकारे त्यांना अभय मिळत असेल तर त्यांच्याविरुध्द कारवाई कशी होणार आहे?

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ गितेनंतर 10:20

श्री.आर.आर.पाटील (गृहमंत्री) : सभापती महोदय, जी घटना माननीय सदस्यांनी सांगितली आहे त्याबद्दलची माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. कोण एसपी राजकीय व्यासपीठावर गेला का, सूत्र संचालन केले होते का याची माहिती मी स्वत: घेईन, या गोष्टी मी सहन करणार नाही. परंतु पोलिसांनी आणि राजकीय पक्षांनी संयुक्तपणे मिसिंग व्यक्तींसाठी आणि अंधश्रध्देविषयी मेळावा घेतला होता का हे तपासून पहावे लागेल.

सभापती महोदय, चोरंबा या गावातील एक मुलगी गायब झाली म्हणून 24.10 रोजी त्यांनी मिसिंगची तक्रार दिली. 28.11 रोजी मुरली तांडा येथे काही आरोपी गुप्त धनाचा शोध घेत आहेत म्हणून जमिनीची पूजा करुन तेथे जमीन उकरत होते. काही लोकांनी बघितले की, हे लोक गुप्त धनाचा शोध घेत आहेत, दुसऱ्यांना अशी शंका आली की येथे लहान मुलाचा बळी देणार आहेत. हे चारही आरोपी पोलिसांनी पकडले आहेत. त्यांना पोलीस कस्टडी मिळाली होती, आता जामीन मिळाला आहे. त्यांची कसून तपासणी करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, खड्डा खणताना चोरंबा येथील जी मुलगी हरवलेली आहे तिचा कदाचित या ठिकाणी बळी देतील अशी तिच्या आईला शंका आली. हे आरोपी गुप्त धनाचा शोध घेत असताना सापडल्यानंतर तिच्या आईने दुसरी एक तक्रार दिली की, कदाचित माझ्या मुलीला बळी देण्यासाठी यांनी तिला पळवून नेले असावे. तो गुन्हा पोलिसांनी नोंद करुन घेतला. परंतु तसे काही आढळून आले नाही. तिचा मुलीचा बळी देण्याचा प्रकार घडलेला नव्हता. पण ही गोष्ट खरी आहे की, जमिनीची पूजा करुन त्यांना जमिनीतील धन वगैरे दिसते म्हणून ते जमीन उकरत होते. पोलिसांनी त्यांना पकडले असून कसून तपास केला आहे. परंतु मुलीचा शोध अजून लागलेला नाही.

सभापती महोदय, हा सगळा तपास तातडीने होण्याच्या दृष्टीने आणि जी मुलगी बेपत्ता आहे तिचा शोध घेण्याच्या दृष्टीने लोकल क्राईम ब्रँचकडे हा तपास वर्ग करण्याच्या सूचना देण्यात येतील आणि या मुलीचा कसून शोध घेण्यात येईल. माननीय सदस्यांनी राजकीय कारणे सांगितली आहेत, तो जर पक्षाचा कार्यक्रम असेल आणि वरिष्ठ अधिकारी तेथे जाऊन सूत्र संचालन करीत असतील तर त्याची मी स्वत: माहिती घेतो आणि कारवाई करतो.

------

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील भूविकास बँकांचे पुनरुज्जीवन करणे

**मु. शी.** : राज्यातील भूविकास बँकांचे पुनरुज्जीवन करणे या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 34051 ला दिनांक 11 डिसेंबर, 2012 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.विक्रम काळे,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, "राज्यातील भूविकास बँकांचे पुनरुज्जीवन करणे" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 34051 ला दिनांक 11 डिसेंबर, 2012 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

सभापती महोदय, राज्यात शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये हरित क्रांतीचे बीज रोपण करणारी बँक म्हणून भूविकास बँकेकडे बघितले जायचे. गेल्या काही वर्षांमध्ये भूविकास बँका नामशेष झाल्याचे चित्र महाराष्ट्र राज्यामध्ये दिसून येत आहे. राज्यातील या भूविकास बँकांची अत्यंत दयनीय अवस्था झालेली दिसून येते.

नंतर एफ.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

प्रत्येक अधिवेशनामध्ये, प्रत्येक वेळेला भूविकास बँकेच्या संदर्भात चर्चा घडून येत असते. परंतु असे असतांनाही भूविकास बँकेच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाकडून कोणत्याही प्रकारचे ठोस निर्णय किंवा धोरण आखले जात नाही ही अत्यंत खेदाची बाब आहे. या निमित्ताने माझे सन्माननीय मंत्री महोदयांना काही प्रश्न आहेत. सन्माननीय मंत्री महोदय ग्रामीण भागतील असून त्यांना शेतकऱ्यांचा कळवळा असून ते शेतकऱ्याचे सुपुत्र आहेत त्यामुळे भूविकास बँकेचे हित लक्षात घेऊन भूविकास बँकेचे पुनरुज्जीवन करतील अशी अपेक्षा या ठिकाणी मी व्यक्त करतो.

सभापती महोदय, आज रोजी राज्यामध्ये किती भूविकास बँकाच्या शाखा अस्तित्वात आहेत, भूविकास बँकाची सर्व कार्यालय सुरु आहे काय, या शाखांमध्ये कोणते कामकाज चालते, ज्या ठिकाणच्या भूविकास बँका सुरु आहेत त्या बँकेच्या कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा दिले जाते काय, या बँकामधून जे काही कर्ज दिले होते त्या कर्जाच्या वसुलीची आजची अवस्था काय आहे, भूविकस बँक सहकारी बँकामध्ये विलीन करणार की, या बँकेचे आपण पुनरुज्जीवन करणार, पुनरुज्जीवन करणार असाल तर किती दिवसाच्या आत निर्णय होणार आहे ? याबाबतीतील ठोस धोरण माननीय मंत्री महोदय जाहीर करतील अशी अपेक्षा मी कार्यप्रवण मंत्र्यांकडून व्यक्त करतो.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री): सभापती महोदय, राज्यातील भूविकास बँकेच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी महत्वपूर्ण अर्धातास चर्चा उपस्थित केलेली आहे. या बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मध्यम आणि दीर्घ मुदतीचे कर्ज दिले जात होते. शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने या बँकेकडून आधार मिळत होता. परंतु 1997-98 पासून या बँकेचे कर्जवाटप बंद झालेले आहे. त्यामुळे या बँकेचे पुनरुज्जीवन व्हावे यासंदर्भात विधानसभा व विधान परिषदेत अनेक वेळेला प्रश्न उपस्थित करण्यात आलेले आहेत. मध्यंतरीच्या काळात भूविकास बँकेच्या संदर्भात शासनाने लघु गटाची स्थापना करुन त्यांना परिपूर्ण अभ्यास करण्याच्या शिफारसी देण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यामुळे लघु गटाने त्यांच्या शिफारसी शासनाकडे सादर केल्या व त्या शिफारसी शासनाने तत्वत: स्वीकारल्या.

आपल्याला कल्पना आहे की, आरबीआयने कोणत्याही बँकेने लायसन्स घेणे बंधनकारक केले असून ज्या बँकाकडे लायसन्स नसेल अशा बँकाना व्यवहार करु दिले जाणार नाही अशा प्रकारचे धोरण घेतलेले आहे. शासनाने लघु गटाच्या शिफारसी स्वीकारल्या असल्या तरी सुध्दा या बँकाना लायसन्स मिळण्याच्या संदर्भात अभ्यास केला तर आरबीआयने लायसन्सच्या संदर्भात 4 टक्के सीआरएआर पाहिजे असे जे निकष लावलेले आहेत ते निकष या बँका पूर्ण करु शकत नाही अशी स्थिती आहे. नाबार्डच्या माध्यमातून भूविकास बँकाना पुन्हा कर्ज पुरवठा द्यावयाचा असेल तर शासनाला मोठया प्रमाणात हमी द्यावी लागेल. परंतु शासन एवढया मोठया प्रमाणात हमी देऊ शकत नाही अशी वस्तुस्थिती आहे. त्यामुळे भूविकास बँकेचे पुनरुज्जीवन करण्यात अडचणी येत आहेत. यासंदर्भात शासनाने अद्यापपावेतो निर्णय घेतलेला नाही.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भातील एक लक्षवेधी सूचना विधानसभेत आली होती व आज विधान परिषदेत अर्धातास चर्चेच्या माध्यमातून चर्चा उपस्थित झालेली आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ ST/ 10:30

श्री.प्रकाश सोळंके...

या संबंधी सर्व पक्षीय आमदारांची बैठक याच अधिवेशनाच्या काळात निश्चितपणे घेण्यात येईल. ज्या सन्माननीय सदस्यांना या बैठकीला उपस्थित रहायचे असेल अशांना आमंत्रण देखील देणार आहोत. येथे 2-3 प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. एकूण 29 जिल्हा बँका आहेत. त्याच्या 185 शाखा असून सध्या 1356 कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांचा महिन्याचा पगार 3 कोटी 13 लाख रूपये इतका आहे. सध्या पगार होत नाही ही वस्तुस्थिती आहे. या कर्मचाऱ्यांबद्दल प्रश्न निर्माण झाला आहे. या कर्मचाऱ्यांना वाऱ्यावर सोडून देता येणार नाही. आजच्या तारखेला कर्मचाऱ्यांची एकूण देणी रूपये 78.00 कोटी एवढी आहेत. सुदैवाने या बँकाची मालमत्ता मोठ्या प्रमाणावर आहे. या बँकेच्या कर्मचाऱ्यांची देणी आणि इतर देणी या संबंधी पुढच्या 1-2 आठवड्यात बैठक घेऊन शासन सकारात्मक भूमिका निश्चितपणे घेईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, हा अत्यंत गंभीर व चिंताजनक प्रश्न आहे. एकूण 1356 कर्मचारी आहेत. त्यांची 78 कोटी रूपयांची देणी बाकी आहेत. एक महिन्यांचा पगार झाला नाही तर काय अवस्था होते याची सर्वांना माहिती आहे. या कर्मचाऱ्यांना तातडीने देणी कशा पद्धतीने देता येतील या प्रश्नाकडे लक्ष घालणे आवश्यक आहे. माननीय मंत्री महोदयांनी तातडीने लक्ष घालण्यासाठी पावले उचलल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. कर्मचाऱ्यांची देणी कशा पद्धतीने देता येईल यासंबंधी हे अधिवेशन संपण्यापूर्वी माननीय मुख्यमंत्री, माननीय वित्त मंत्री यांच्याकडे जाऊन निर्णय घेणे आवश्यक आहे. या प्रश्नाबाबत याच अधिवेशनात माननीय सभापती किंवा माननीय अध्यक्ष यांच्या सोबत बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावावा अशी मी विनंती करतो.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, आपण लक्षात घेतले पाहिजे ह्या स्वायत्त संस्था आहेत. प्रत्येक सहकारी संस्थेचे देणे शासनाने द्यायचे म्हटले तर राज्यात फार गंभीर परिस्थिती निर्माण होईल. आज राज्यात 103 अर्बन बँका असून त्या अवसायानात गेलेल्या आहेत. त्या प्रत्येक बँकेतील कर्मचाऱ्याची जबाबदारी शासनाने घेतली तर शासनाचे संपूर्ण बजेट त्यावरच खर्च होईल. कर्मचाऱ्यांची तळमळ शासनाला आहे. कर्मचाऱ्यांची देणी लवकरात लवकर देण्या विषयी तातडीने पावले उचलली जातील.

...................

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, आपण क्रमवार अर्धा-तास चर्चा घ्याव्यात अशी माझी विनंती आहे. ..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पश्चिम घाट वन क्षेत्रात परदेशी झाडांच्या लागवडीमुळे जैव विविधता धोक्यात येणे

**मु. शी.** : पश्चिम घाट वन क्षेत्रात परदेशी झाडांच्या लागवडीमुळे जैव विविधता धोक्यात येणे यासंबंधी श्री.चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"पश्चिम घाटातील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असलेल्या वनक्षेत्रात परदेशी झाडांच्या लागवडीमुळे जैव विविधता धोक्यात आली असणे, या प्रकारच्या झाडांच्या संदर्भात अनेक तज्ञ किंवा अनुभवी शेतकरी यांच्याशी चर्चा केली असता हे वृक्ष स्थानिक परिस्थितीशी जुळवून घेत असले तरीही त्यापासून पर्यावरणाची हानीच करीत असल्याचे मत असणे, या वृक्षावर सहसा पक्षी न बसणे, किंवा घरटेही न बांधणे वन्य प्राणी अशा झाडाखाली आश्रय घेत नसणे, या झाडाखाली गवत किंवा अन्य वनस्पती उगवत नसणे, ह्या वृक्षाचे आयुर्मान कमी असणे, त्यामुळे भविष्यात अनेक समस्यांना सामोरे जावे लागणार असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, राज्यातील पिकाच्या पॅटर्नबाबत पुन्हा एकदा विचार करण्याची आवश्यकता आहे. वन विभागा मार्फत लावण्यात येणाऱ्या झाडांबाबत देखील विचार करण्याची आवश्यक आहे. मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट वन विभागाला देण्यात येते. वन विभागा मार्फत कमी पाण्यावर लवकर वाढणाऱ्या झाडांची लागवड करण्यात येते. यात आकेशिया, मँझम, सुबाभूळ, निलगिरी ही झाडे सदासर्वकाळ हिरवीगार राहतात. त्यामुळे ही झाडे लावण्याकडेच विभागाचा जास्त भर जातो.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.चंद्रकांत पाटील.....
त्या झाडांना पाणी कमी लागते. परंतु ती झाडे ऑक्सिजन देत नाही. त्या झाडांवर कोणतेही पक्षी बसत नाही. त्या झाडांची सावली मिळत नसल्यामुळे कोणतेही वन्यप्राणी त्या झाडांखाली बसत नाहीत.

सभापती महोदय, आपण ज्या प्रकारची जंगले वर्षानुवर्षे वाढविली त्यामध्ये लिंब, वड, पिंपळ, हिरडा, बेडा, जांभूळ, पिंजळ अशाप्रकारची वनस्पती काळाच्या ओघात नष्ट करु लागलो आणि लवकर वाढणारी झाडे, कमी पाणी लागणारी झाडे, सदा हिरवीगार राहणारी झाडे लावू लागलो, ज्या झाडांचा पर्यावरणाच्या दृष्टीने, प्राण्यांच्या दृष्टीने तसेच मनुष्यांना काहीही उपयोग नाही अशी झाडे लावू लागलो तर भविष्यात खूप मोठे प्रश्न निर्माण होतील. तेव्हा वन विभागाकडून अशाप्रकारची परदेशी झाडे लवकर वाढतात, पाणी कमी लागते आणि आपले टार्गेट पूर्ण व्हावे या हेतूने ही झाडे लावण्यात आली आहेत काय असा माझा प्रश्न आहे. तेव्हा यापुढे अशाप्रकारची झाडे न लावता ज्या झाडांचा पर्यावणाच्या दृष्टीने आणि प्राणीमात्रांना उपयोग होईल अशा प्रकारची झाडे लावून पर्यावणाचा समतोल राखावा अशी माझी विनंती आहे.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ( वने राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून एका महत्वाच्या विषयाकडे शासनाचे लक्ष वेधले आहे.

सभापती महोदय, काही वर्षापूर्वी शासनाने ज्या झाडांना प्रत्यक्षात पाणी घालून वाढवावे लागत नाही अशी झाडे लावण्याचा कार्यक्रम सामाजिक वनीकरण विभागामार्फत घेण्यात आला होता. राज्यात वनीकरण वाढले नाही म्हणून टीका झाली होती. तेव्हा दर दोन वर्षांनी झाडे लावण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. प्रत्यक्षात किती झाडे लावण्यात आली आणि त्यापैकी किती झाडे जगली याचा ताळमेळ बसत नव्हता. तेव्हा शासनाने असा निर्णय घेतला की, परदेशी झाडांना पाणी घालावे लागत नाही आणि ती झाडे लवकर वाढतात म्हणून ऑस्ट्रेलियन बाभूळ,निलगिरी,सुरु अशा प्रकारची झाडे सामाजिक वनीकरण विभागामार्फत लावण्यात आली ही गोष्ट खरी आहे. परंतु ज्या ठिकाणी वन विभागाची जंगले आहेत त्याठिकाणी अशाप्रकारची झाडे लावण्याचा कार्यक्रम कधीही घेण्यात आला नाही. आता शासनाच्या असे लक्षात आले की, ऑस्ट्रेलियन बाभूळ, निलगिरी या झाडांच्या खाली कोणत्याही प्रकारची छोटी झाडे वाढत नाहीत, तेथे गवत सुध्दा उगवत नाही. निलगिरीचे झाड मोठ्या प्रमाणावर वाढते ही गोष्ट खरी आहे. पण त्या झाडाची पाने छोटी असल्यामुळे त्या झाडावर पक्षी देखील बसत नाहीत. त्या झाडाखाली सावली मिळत नाही. शास्त्रीय दृष्टीकोनातून वेगवेगळी कारणे असली तरी या परदेशी झाडांपासून कोणाताही फायदा मिळत नाही.

सभापती महोदय, सन 2009 मध्ये कोकणामध्ये फयान वादळ आले होते. या फयान वादळामध्ये परदेशी जातीची झाडे मोठ्या प्रमाणावर उन्मळून पडली होती. रस्त्याच्या कडेला असलेली ही परदेशी झाडे विजेच्या तारांवर पडल्यामुळे विद्युत पुरवठा बंद झाला होता आणि खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान देखील झाले होते. तेव्हा अशा प्रकारची झाडे लावण्याचा कार्यक्रम बंद केलेला आहे.

सभापती महोदय, मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, माननीय वने मंत्री महोदयांनी 100 कोटी झाडे लावण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. ही 100 कोटी ज्या ज्या ठिकाणी लावावयाची आहेत तेथे स्थानिक प्रजातीची झाडे लावण्यात येतील. त्याप्रमाण तशा झाडांची नर्सरीमध्ये वाढ करुन किंवा कलमे करुन ती झाडे लावण्यात येतील जेणेकरुन ती झाडे तेथील निसर्गाशी सामना

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

करु शकतील. पशुपक्षांचे रक्षण करु शकतील. जैवविविधता टिकवणे आणि पर्यावरणाचा समतोल राखणे या दृष्टीकोनातून मदत होऊ शकेल अशा प्रकारची झाडे लावण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, परदेशी झाडे लावल्यामुळे काही पशुपक्ष्यांच्या प्रजाती नष्ट होत आहेत. ज्या प्रजाती नष्ट होणार नाहीत याची काळजी घेण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पश्चिम घाटाच्या संदर्भात प्रश्न विचारला असला तरी आम्हाला संपूर्ण राज्याचा विचार करावा लागतो. कोस्टल लाईनला सुरुचीच झाडे का लावली जातात याची मी माहिती घेतली. कोस्टल लाईलना सुरुची झाडे लावल्यामुळे समुद्र किनारी होणारी जमिनीची धूप मोठ्या प्रमाणावर थांबते.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

म्हणून ती झाडे लावली तरी बाकीच्या ठिकाणी वन विभागाच्या जमिनीवर कोठेही अशा प्रकारच्या प्रजातींची झाडे लावण्याचा निर्णय झालेला नाही. पंचवार्षिक योजनेमध्ये जी 100 कोटी झाडे लावणार आहोत त्यामध्ये सुध्दा अशा प्रकारच्या प्रजातींची झाडे लावावयाची नाहीत असा निर्णय घेतला असल्यामुळे शासन पर्यावरण व जैवविविधता यांचे रक्षण करण्याच्या दृष्टीने काळजी घेत आहे, हे दिसून येईल.

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : चंद्रपूर जिल्ह्यातील राजूरा तालुक्यातील लक्कडकोट गुडा येथे आदिवासी कूळ कायद्यात मिळालेल्या जमिनीची गैररित्या विक्री करणे

**मु. शी.** : चंद्रपूर जिल्ह्यातील राजूरा तालुक्यातील लक्कडकोट गुडा येथे आदिवासी कूळ कायद्यात मिळालेल्या जमिनीची गैररित्या विक्री करणे, यासंबंधी श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्रीमती शोभाताई फडणवीस (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते :-

"चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यात लक्कडकोट गुडा येथे 70 वर्षांपूर्वी सर्व्हे नं. 92 मध्ये 300 लोकवस्ती असलेले पारधी समाज वसलेले असून, त्यांना कूळ कायद्यातून मारवाडी तुकाराम राजकोंडावर यांच्या 17 एकर जमिनीचा मालकी हक्क श्री. आबाजी देशमुख शेरेकर यांना बहाल होणे, व त्यावर गावातील कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असणे, परंतु सदर जमीन आदिवासींना कूळ कायद्यात मिळाली असून तेथील श्री. राजकोंडावार यांचे नातू बाप-दादाची जमीन आहे म्हणून सदर जमीन विकण्याचा सौदा करुन ती जमीन 60 लाखात विकण्यात येणे, दिनांक 29 जुलै, 2011 रोजी राजुरा तहसील कार्यालयातील उप निबंधक कार्यालय येथे विक्री पत्र करण्यात येणे, परंतु आदिवासी कूळ कायद्यात मिळालेल्या जमिनीची विक्री होत नसतांना झालेला गैररित्या व्यवहार, त्यामुळे आदिवासींना हक्कापासून वंचित होण्याची आलेली वेळ, शासनाने गैररित्या होणाऱ्या विक्री प्रकरणी कारवाई करण्याची आवश्यकता. "

सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील लक्कडकोट गुडा या भागावर मोठ्या प्रमाणात अन्याय झाला आहे. महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर राजुरा हा भाग निजामाच्या परिसरात होता. तो महाराष्ट्रात आल्यानंतर त्या भागाचे अर्धे रेकॉर्ड महाराष्ट्रात आले आणि अर्धे रेकॉर्ड आले नव्हते. त्यामुळे त्या गावाचे नेमके क्षेत्रफळ किती, लोकसंख्या किती, शेतीचे क्षेत्र किती याची माहिती नव्हती. त्यामुळे आता मोठ्या प्रमाणावर या बाबत मागणी झाल्यानंतर त्या

..3..

श्रीमती शोभाताई फडणवीस....

ठिकाणी सर्व्हे सुरु झालेला आहे.

राजुरा तालुक्यातील 12 गावांचा प्रश्न वारंवार विधिमंडळात चर्चेला जात आहे. परंतु अजूनही तो प्रश्न आपण सोडवू शकलो नाही. जिवती तालुक्याची निर्मिती झाल्यानंतर त्या ठिकाणी तहसील इमारतीचे बांधकाम करण्यासाठी आदिवासींच्या घराच्या ले-आऊटची जागा दिली. अशा प्रकारे विविध बाबतीत राजुरा तालुक्यावर मोठ्या प्रमाणात अन्याय झाला आहे. हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. हा जुना राजुरा तालुका होता. जिवती व कोरपना हे दोन तालुके नंतर निर्माण झाले. लक्कडकोट गुडा हा भाग राजुरा तालुक्यामध्ये आहे. आंध्र प्रदेशच्या बॉर्डवरील हे गाव आहे. शिवाय नक्षलवाद्यांचा प्रभाव असलेले हे गाव आहे. आदिवासी पारधींचा 70 वर्षापूर्वीचा हा गुडा आहे. या गुड्याची लोकसंख्या 300 च्या वर आहे. त्या लोकांना कूळ कायद्यांतर्गत मोठ्या प्रमाणावर जमीन मिळाली होती. आदिवासींच्या नावाने पैसा भरुन त्या बाबत रेकॉर्डही झाले. असे असताना त्या ठिकाणी एक व्यक्ती जाते आणि ही जमीन सुधाकरराव नाईक यांच्या नावाची आहे असे सांगते. महोदय, मुळात ती जागा अदिवासी पाड्याची आहे. आदिवासी लोक हे घाबरट, अज्ञानी आणि गरीब आहेत. ते आक्रमक नाहीत. वास्तविक पाहता लक्कडकोट गुडा हे गाव त्यांच्या नावाने असताना किंबहुना त्यांच्या नावावर जमिनी असताना एका गाडीतून एक व्यक्ती येऊन गावकऱ्यांना त्या गावातील शेती आणि घरे खाली करा अशी धमकी देत आहे. इंग्रजांच्या काळाची आठवण यावी अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात त्या लोकांवर अन्याय होत आहे. उद्या जेव्हा आम्ही जमिनीच्या मोजणीकरिता येऊ तेव्हा कोणीही विरोध करु नये, नाही तर तुमच्यावर केसेस दाखल करुन असे त्या लोकांकडून गावकऱ्यांना धमकाविले जाते.

महोदय, मी चौकशी केली असता जयसर परशुराम शेरकुरे या व्यक्तीच्या नावाची ती जमीन आहे. या बाबत मी त्याला विचारणा केली असता, त्यांनी जे सांगितले ते चीड निर्माण करणारे आहे. त्यांनी सांगितले की, "मांगल्या महिन्यामंधी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक आमच्या गावात आलते, त्यांनी आमचे संमदे देव फोडले, आंगणवाडीवरील टीनबी काढून फेकून दिले. तो कव्हा येईन अन आम्हाले गावातून हाकलून देईन सांगता येत नाही." महोदय, हे उद्‌गार जमीन मालकाने काढले. हे गाव माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईकांच्या नावाने आहे, अशा पध्दतीचा त्या ठिकाणी बोलबोला सुरु आहे. मुळात माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांचे निधन होऊन अनेक

..4..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभाताई फडणवीस....

वर्षे झाली. सुधाकरराव नाईक यांचा आम्ही नेहमी आदर करतो. त्यांनी पारधी समाजाला कधीही हात लावलेला नाही. त्यांचे मोठेपण आम्हाला माहीत आहे. त्यांच्याबद्दल आमच्या मनात नितांत आदर आहे. परंतु काही लोक सुधाकरराव नाईक यांच्या नावाने 60 लाख रुपयांत गाव विकत घेतले आहे असे सांगत आहेत. ती जमीन सुधाकरराव नाईक यांच्या नावाची आहे म्हणून त्या ठिकाणी आश्रमशाळा बांधली गेली. 17 एकर 20 गुंठे जमीन आबाजी देशमुख शेरेकर यांनी विकत घेतली आहे. त्याचे मोठ्या प्रमाणावर रेकॉर्ड झाले आहे. असे असताना हैद्राबाद कूळ वहिवाट शेती जमीन अधिनियम 1950 अंतर्गत या जमिनीचे स्वामित्व अधिकार वक्तू तांडेकर यांना बहाल झाले. त्यांनी 450 रुपये दराने राजुरा, उप निबंधक कार्यालयात विक्रीचे व्यवहारही केले.

नंतर श्री.बरवड....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

वक्तूच्या मृत्यूनंतर ती जागा त्यांची पत्नी पार्वताबाई हिच्या नावे फेरफार झाली. असे असून सुध्दा ती जागा विकून त्या ठिकाणी सुधाकरराव नाईक यांच्या नावाने आश्रमशाळा बांधली गेली. ती विधवा बाई आजही त्या आश्रमशाळेसमोर जाऊन रडत बसलेली आहे. म्हणून या गावाची विक्री करणाऱ्या उपनिबंधकांनी या रेकॉर्डमध्ये फेरफार केला असेल आणि त्या ठिकाणी आदिवासींवर अन्याय होत असेल तर त्यांची जागा त्यांना परत मिळावी. ज्या जागेवर आश्रमशाळा बांधण्यात आली त्या बाईला जमीन परत करावी किंवा तिला 10 लाख रुपये देण्यात यावेत. रागीट या नावाने सुध्दा अशा पध्दतीचे मोठ्या प्रमाणात व्यवहार केलेले आहेत त्या संपूर्ण व्यवहाराची चौकशी करुन लक्कडकोट गुड्याला न्याय द्यावा अशी मी या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून विनंती करते.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील लक्कडकोट गुडा सर्व्हे नंबर 2 च्या संदर्भामध्ये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. यामध्ये वस्तुस्थिती अशी आहे की, सर्व्हे नंबर 92 मध्ये अंदाजे 2 एकर जमिनीवर 50 ते 55 पारधी कुटुंबांची घरे असून त्यांची लोकसंख्या 150 आहे. सदर सर्व्हे नंबरच्या उर्वरित जमिनीवर आबाजी देशमुख शेरकुडे यांची वहिती आहे पण आपण जर मालकी हक्कामध्ये पाहिले तर निश्चितपणे सदर जमीन श्री. मार्कंडी तुकाराम राजकोंडवार यांच्या नावाने होती व त्यांच्या मृत्यूनंतर वारसा हक्काने त्यांचा नातू श्री. अमोल पुरुषोत्तम राजकोंडवार यांच्या नावे 7/12 वर नोंद झालेली आहे. त्यामुळे आदिवासींना किंवा कूळ कायद्याच्या माध्यमातून ही जमीन दिलेली आहे असे कोठेही रेकॉर्डवरुन दिसून येत नाही. त्याचबरोबर जुना सर्व्हे नंबर 1 मध्ये जी 580 एकर आणि काही गुंठे जमीन आहे त्या सर्व्हे नंबरमध्ये नवीन गट क्रमांक 32 आणि 33 आहे त्यावर श्री. आबाजी देशमुख शेरकुडे यांच्या सर्व्हे नंबर 32 मध्ये 8 एकर 26 गुंठ्याचा फेरफार मंजूर करण्यात आलेला आहे. तसा त्यांच्या नावाने अभिलेख दुरुस्त झालेला आहे. परंतु उर्वरित सर्व्हे नंबर 33 मध्ये जी 5 एकर 1 गुंठा जमीन श्री. शेरकुडे यांच्या नावाने दर्शविलेली आहे त्याचा अजून फेरफार झालेला नाही. सदर जमीन नेमकी कोणत्या सर्व्हेनंबरमध्ये येते याचा बोध सद्य:स्थितीत होत नाही. त्यासाठी पुनर्मोजणी करणे आवश्यक आहे. ही पुनर्मोजणी झाली तर त्या संदर्भात नेमकी काय परिस्थिती आहे याचा बोध होईल.

सन्माननीय सदस्यांनी आश्रमशाळेच्या बाबतीत किंवा पारधी लोकांच्या बाबतीत जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत आणि त्या बाबतीत जी काही मागणी केलेली आहे त्या संदर्भात एका वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत या संपूर्ण बाबतीत चौकशी करुन त्याचा अहवाल शासनाकडे मागविण्यात येईल. त्याचप्रमाणे पुनर्मोजणी करण्याबाबत आदेश दिले जातील. पारधी बेघर होऊ नये या संदर्भात आपली जी तळमळ आहे त्याबाबत शासन खबरदारी घेईल असे मी या निमित्ताने आपणास सांगतो.

----

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महिला शिक्षण सेविकांवर प्रसूती रजेच्या बाबतीत होत असलेला अन्याय

**मु. शी.** : महिला शिक्षण सेविकांवर प्रसूती रजेच्या बाबतीत होत असलेला अन्याय यासंबंधी श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"शासनमान्य खाजगी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, माध्यमिक आश्रमशाळा अध्यापक विद्यालये, तंत्र माध्यमिक विद्यालयांना 1981 ची महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती नियमावली लागू असणे, नियम 16 अन्वये महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती रजेची तरतूद असणे, 1 वर्षापेक्षा कमी सेवा असल्यास प्रसूती रजा बिनपगारी देय असणे, 1 वर्षापेक्षा अधिक कालावधीच्या सेवेनंतर वेतनासह रजा देय असणे, 1 वर्षाच्या सेवेनंतर प्रसूती रजा ही महिलांची हक्काची रजा असणे, शिक्षण सेवकांनाही प्रसूती रजेचे नियम नियमित महिला कर्मचाऱ्यांप्रमाणे लागू असणे, 1 वर्षापेक्षा अधिक सेवा असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना शिक्षण सेवक कालावधी प्रसूती रजेइतका शिक्षण सेवक कालावधी वाढविण्याचा निर्णय घेणे, महिला कर्मचाऱ्यांचा देय रजेचा कालावधी अर्हताकारी सेवा न धरणे महिला कर्मचाऱ्यांवर अन्यायकारक असणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही. "

सभापती महोदय, या ठिकाणी महिलांच्या प्रसूती रजेच्या संदर्भातील हा विषय आहे. यामध्ये शासनावर कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोजा पडणार नाही किंवा शासनाला आर्थिक तोशीस लागेल असा कोणताही विषय यामध्ये नाही. फक्त शासन निर्णयाचे इंटरप्रिटेशन म्हणजे त्या शासन निर्णयाचा नक्की काय अर्थ होतो या संदर्भात जो घोळ खात्याच्या अधिकाऱ्यांनी निर्माण केलेला आहे त्या संदर्भात मी ही अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे.

सभापती महोदय, शिक्षण सेवकांमध्ये ज्या महिला शिक्षण सेविका आहेत त्यांना रजेच्या संदर्भात 1981 ची नियमावली लागू आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

2003 व 2007 च्या जी.आर.मध्ये असे नमूद केले आहे की, "1981 सालातील नियमावलीतील प्रसुती रजेच्या संदर्भातील सर्व तरतूद या शिक्षण सेविकांना व महिला कर्मचाऱ्यांना लागू राहील." 1981 सालातील नियम क्र.16.15 मध्ये असे नमूद केले आहे की, "Maternity leave under sub-rule (14) shall be granted on half pay to an employee, who has put in more than one year's but less than two years service before the date of commencement of such leave. In the case of employee who has put in two year's service or more on the date of commencement of such leave, she shall be granted maternity leave with full pay." याचा अर्थ असा आहे की, 1981 सालातील नियमावलीतील तरतुदीनुसार प्रसूती रजा त्यांना देय ठरत असेल तर ही रजा एक वर्षापेक्षा अधिक सेवा झाली असेल तर अर्ध पगारी, 2 वर्षापेक्षा अधिक सेवा झाली असेल तर पूर्ण पगारी मिळते. ही बिनपगारी रजा नाही. ही अनुज्ञेय रजा आहे. महिला भगिनींना हक्काने मिळणारी रजा आहे. परंतु दिनांक 8.3.2010 रोजी काढलेल्या जी.आर.मध्ये अनुज्ञ ेय रजेचा उल्लेख न करता असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, "महिला शिक्षण सेविकांना व महिला शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांचा शिक्षण सेवकाचा कालावधी पूर्ण करीत असताना प्रसूती रजा घ्यावी लागल्यास शिक्षण सेवक पदाचा कालावधी त्या प्रमाणात वाढविणे आवश्यक आहे. म्हणजे एक वर्षाची सेवा, दोन वर्षाची सेवा किंवा 3 वर्षाची सेवा पूर्ण होण्याच्या आत देय रजा सुध्दा वाढवित आहात ते बरोबर नाही.

या संदर्भात दिनांक 12.12.2008 रोजीच्या जी.आर.मध्ये स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की, "अनुज्ञेय धरलेल्या अनुपस्थितीचा कालावधी व मान्य केलेल्या सुट्यांचा कालावधी वगळता अनुपस्थितीचा अन्य कालावधी कर्तव्यासाठी धरला जाणार नाही. याचा अर्थ असा आहे की, अनुज्ञेय रजेचा कालावधी शिक्षण सेवकाचा कालावधी वाढविण्यासाठी ग्राह्य धरावयाचा नाही. जर एक वर्षासाठी अर्ध पगारी, दोन वर्षासाठी पूर्ण पगारी रजा अनुज्ञेय आहे, जी रजा 1981 च्या नियमावलीत आहे, 12.12.2008 रोजीच्या जी.आर.मध्ये नमूद केलेली आहे, असे असतानाही शिक्षण सेवकांचा कालावधी वाढवित असतील तर हे बरोबर नाही. शासनाच्या

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

परिपत्रकाच्या किंवा जी.आर.च्या इंटरप्रिटिशनचा भाग आहे.  माझी एकच मागणी आहे. ज्या शिक्षण सेविका, महिला कर्मचारी आहेत त्यांना एक वर्षानंतर अर्ध पगारी, दोन वर्षानंतर पूर्ण पगारी रजा मिळते, ही देय रजा आहे.  ती हक्काची रजा आहे, त्यामुळे तीन वर्षाच्या आत त्यांनी ही रजा घेतली असेल तर त्यांचा शिक्षण सेवक पदाचा कालावधी वाढविता कामा नये. यासंबंधी मंत्री महोदयांनी निर्णय द्यावा अशी मी विनंती करतो.

-------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, संपूर्ण राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी बहिष्कार घातल्यानंतर शासनाने सभागृहात निवेदन केले होते. त्या शिक्षकांची प्रमुख मागणी अशी होती की, महिला शिक्षण सेविकांना शिक्षिकांप्रमाणेच प्रसूती रजा दिली पाहिजे. मंत्री महोदयांनी त्यावेळी ही मागणी मान्य केलेली असल्यामुळे त्या मागणीच्या संदर्भात मंत्री महोदया, आज जी.आर.घेऊन आल्या असतील तर त्याचा खुलासा करावा अशी मी विनंती करतो.

-----

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेते ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न सातत्याने मांडलेला आहे. या प्रश्नाबाबत आंदोलन उभे केलेले आहे. हा प्रश्न जनतेसमोर नेलेला आहे. या प्रश्नाबाबत सरकारला उशिरा का होईना सरकारला जाग आली आहे. त्यामुळे मंत्री महोदया सकारात्मक उत्तर देतील अशी माझी अपेक्षा आहे.

-----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ KTG/ D/ D/ पूर्वी श्री. खंदारे 10:55

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : मी यासंबंधी सभागृहामध्ये उत्तर दिलेले आहे. तरीही मी पुन्हा एकदा सांगते की शिक्षण सेवकांसाठी 180 दिवस प्रसूती रजा करण्याच्या बाबतीत सरकारने सकारात्मक निर्णय घेतलेला आहे. यासंबंधीचा जी.आर. एक-दोन दिवसात काढण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक आणि उच्च माध्यमिक शिक्षक या सर्वांसाठी हा जी.आर. काढण्यात येईल काय ?

प्रा. फौजिया खान : सर्व शिक्षण सेवकांसाठी हा जी.आर.काढण्यात येईल.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : यवतमाळ जिल्ह्यातील हिवरी वन परिक्षेत्रातील बोरजाई जंगलात वृक्षांची झालेली अवैध तोड

**मु. शी.** : यवतमाळ जिल्ह्यातील हिवरी वन परिक्षेत्रातील बोरजाई जंगलात वृक्षांची झालेली अवैध तोड यासंबंधी श्री.संदीप बाजोरिया व इतर वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. संदीप बाजोरिया (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

" यवतमाळ जिल्ह्यातील हिवरी वन परिक्षेत्रातील बोरजाई जंगलात गत सहा महिन्यापासून अवैधरित्या सागवानासह अन्य वृक्षांची तोड होणे, वन अधिकारी जंगलतोडीकडे दुर्लक्ष करीत असणे, त्यामुळे वन संपदा कमी होऊन नष्ट होण्याची शक्यता निर्माण होणे, सदर प्रकरणी चौकशी करुन शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये जेव्हा पासून डॉ. पतंगराव कदम हे वने मंत्री आणि श्री. भास्कर जाधव हे वने राज्यमंत्री झाले तेव्हा पासून वनातील वाघ वाघिणीच्या संख्येमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. परंतु वनातील सागाच्या झाडांची संख्या खूप कमी झालेली आहे. यवतमाळ जिल्हयातील हिवरी वन परिक्षेत्रातील बोरजाई जंगलामध्ये मागील एक दीड वर्षापासून सागवान वृक्षाची मोठ्या प्रमाणावर तोड होत आहे. या वृक्षतोडीकडे वन अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत. 30 एप्रिल 2012 रोजी 507 नग असलेला सागाचा ट्रक पकडण्यात आला. हा ट्रक रंगेहात पकडल्यानंतरही अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या गुन्ह्यामध्ये एका राजकीय पक्षाच्या पदाधिका-याला रंगेहात पकडण्यात आलेले होते. परंतु त्याच्या विरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. तेथील तत्कालीन डीएफओ श्री. दोडे यांची सद्या बदली झालेली आहे. त्यांचे त्यांना संपूर्ण अभय होते.

यवतमाळ जिल्हयातील बोरजाई जंगलामध्ये सागाची मोठमोठी झाडे आहेत. ही मौल्यवान वृक्ष संपदा चोरीला जात आहे. त्या ठिकाणी अशोक पुरी नावाचे एक गृहस्थ होते. त्यांनी देखील माल चोरला होता. त्यांच्या विरुध्द देखील गुन्हा दाखल करण्यात आला नाही. त्यांना पकडण्यात आले नाही. तेथे कर्तव्यदक्ष असे श्री. गिरी नावाचे वनक्षेत्रपाल होते.ते त्यावेळी तेथे उपस्थित होते. असे असताना या प्रकरणी काय कारवाई करण्यात आलेली आहे ? या प्रकरणी आपण तेथील

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संदीप बाजोरिया...

आलेली आहे ? या प्रकरणी आपण तेथील डीएफओना निलंबित करणार आहात काय ? यवतमाळ जिल्ह्यामध्ये अनेक वर्षापासून सागवान झाडाची अवैध तस्करी चालू असून त्यास विभागाचे अभय आहे. म्हणून या प्रकरणी श्री. दोडे यांना निलंबित करण्यात येईल काय ?

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (वने राज्यमंत्री) : हा प्रश्न या सभागृहामध्ये 4-5 वेळा उपस्थित करण्यात आला. मी सन्माननीय सदस्यांना नम्रपणे सांगू इच्छितो की, सागवान झाडांची तीन ठिकाणी चोरी झ ाालेली दिसते ती चोरी वन विभागाच्या क्षेत्रामध्ये झालेली नाही. जे खाजगी वनक्षेत्र आहे. त्याठिकाणी ही वृक्षतोड झालेली आहे. ट्रक्टरमधून, ट्रॉलीमधून वाहतूक करताना, तसेच एका शेतक-याच्या शेतामध्ये तोडलेली झाडे पकडण्याचे काम नियमानुसार वन विभागाचे नसून ते महसूल विभागाचे आहे. जेव्हा खाजगी वनामध्ये अवैध तोड होते त्यावेळी त्यासंबंधी कारवाई करण्याचे अधिकार महसूल विभागाला आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

अशा वेळेला निर्गत पास मात्र वन विभाग देत असतो. दोन्ही विभागांकडून कार्यवाही करण्यात आली आहे. संबंधितावर गुन्हा दाखल केलेला आहे, त्यांचा माल जप्त केलेला आहे. हे प्रकरण सध्या कोर्टामध्ये न्यायप्रविष्ट आहे.

महोदय,सन्माननीय सदस्यांची एक तळमळ बरोबर आहे. बऱ्याच वेळेला वन विभागाचे कर्मचारी कायद्यातील वेगवेगळया कलमांचा आधार त्यांना त्रास देऊ शकतात, मज्जाव करु शकतात. फॉरेस्ट लॅन्डच्या बाहेर तोड होते, त्यावेळी कारवाई करण्याचे आमचे काम नाही असे सांगून बऱ्याच वेळेला हात झटकण्याचा प्रयत्न करतात. केवळ निर्गत पास देणे एवढेच वन विभागाचे काम नाही. वन विभागाचे जंगल सांभाळण्यासाठी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अधिक सतर्क राहिले पाहिजे अशा प्रकारच्या सक्त सूचना त्यांना देण्यात आलेल्या आहेत.

श्री.संदिप बाजोरिया : वन परिक्षेत्रात कोठेही झाडांची कत्तल झालेली नाही व ती चोरी पकडली गेली नाही असे या ठिकाणी सांगण्यात आले. परंतु मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, हिवरी वन परिक्षेत्रात बोरजाई येथे एक ट्रक सागवान कापलेले आहे. ते वन परिक्षेत्रातूनच कापलेले आहे. ही चोरी रंगेहाथ पकडली गेली आहे. कोणाच्या खाजगी क्षेत्रातून ती झाडे कापलेली नव्हती. या बाबतीत श्री. दोडे यांना तातडीने सस्पेंड करावे अशी माझी मागणी आहे. श्री.दोडे यांनी भ्रष्टाचार करुन खूप मोठी माया जमा केली आहे. म्हणून त्यांचे विरुध्द वरिष्ठ पातळीवरुन चौकशी केली जाईल काय ?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी एक बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. मला सांगण्यात आले आहे की, हिवरी वन परिक्षेत्रात झाडांची तोड झालेली नाही. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असे आहे की, ती तोड हिवरी वन परिक्षेत्रात झाली आहे, ती तोड खाजगी क्षेत्रात झालेली नाही. सभागृहात सन्माननीय सदस्य माहिती देतात ती खरी आहे असे गृहीत धरण्याची आपली प्रथा आहे. सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती गृहीत धरुन त्या अनुषंगाने चौकशी करण्यात येईल व या बाबतीत जर संबंधित अधिकाऱ्यांनी खोटी माहिती दिली असेल तर त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल.

--------------------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महसूल विभागातील रिक्त पदे भरणे

**मु. शी.** : महसूल विभागातील रिक्त पदे भरणे यासंबंधी श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.शोभा फडणवीस ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते.

"जिल्हा महसूल विभाग हा शासनाचा कणा असूनही राज्यात ४ अप्पर जिल्हाधिकारी, ७१ उपजिल्हाधिकारी, ८१ तहसिलदार, आणि ४३१ नायब तहसीलदार अशी महसूल खात्यातील तब्बल ५८७ पदे रिक्त असणे, सदरची पदे भरण्याकरिता एमपीएससी पासून ते अनेक मार्ग अवलंबून असले तरी याकडे शासनाचे लक्ष नसणे, सरळसेवेची भरती एमपीएससी मार्फत होत मात्र त्यांच्याकडे केवळ महसूलच नाही तर अनेक विभागाच्या मागण्या अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, या विभागात जी पदे रिक्त आहेत त्यात रोहयो, भूसंपादन, करमणूक कर, जिल्हा पुरवठा अधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, पुनर्वसन अशा महत्वाच्या विभागाचा समावेश असणे, आधीच कर्मचारी-अधिकारी काम करीत नसणे त्यातच या रिक्त पदांमुळे मात्र जनतेची अवस्था बिकट होणे, अनेक विकासाची कामे मंदगतीने सुरु असणे तर काही कामे ठप्प होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, या रिक्त जागा तातडीने भरण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही."

सभापती महोदय, जिल्हयातील महसूल विभाग हा शासनाचा कणा आहे. या महसूल विभागात मोठया प्रमाणात जागा रिक्त आहेत. रोजगार हमी, जनगणना, दुष्काळ, शेतीचे फेरफार, पुनर्वसन, भूसंपादन, करमणूक कर, निवडणूक विभाग ही सगळी कामे महसूल विभागाच्या माध्यमातून केली जातात. महसूल विभागात एवढे प्रचंड काम असताना त्या विभागात मोठया प्रमाणात पदे रिक्त आहेत. गेली वर्षी वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे भरावयाची नाहीत असे शासनाने निदेश दिले होते. आता मात्र शासनाने फक्त ३ टक्के पदे भरण्यासंबंधीची परवानगी दिलेली आहे. ३ टक्के नवीन पदे भरली जातील आणि ६ टक्के कर्मचारी सेवानिवृत्त होतील. हा केवढा मोठा

३...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

फरक आहे याचा विचार करण्याची गरज आहे. या विभागातील सर्व रिक्त पदे भरण्याची आवश्यकता आहे.

महोदय, आज या महत्वाच्या विभागातील ४ अपर जिल्हाधिकारी, ७१ उप जिल्हाधिकारी, ८१ तहसीलदार, ४३१ नायब तहसीलदार अशी एकूण ५८७ पदे आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असतील तर महसूल विभागाचे कामकाज होऊ शकत नाही. दुष्काळाच्या परिस्थितीत महसूल विभाग न्याय देऊ शकत नाही. कोणताही कार्यक्रम घेऊ शकत नाही. शेतकरी कामासाठी महसूल विभागात जातात त्यांना कामे न होता परत यावे लागते. शेतकऱ्यांचा भोगवटा २ चा १ करतो म्हणून वारंवार सांगितले जाते. ती कामे महसूल विभाग करीत नाही. वन जमिनीवरील अतिक्रमणासंबंधी पट्टे देऊ शकत नाहीत. ही सर्व कामे महसूल विभागाकडून होतात. महसूल विभागातील पदे एमपीएससीच्या माध्यमातून भरली जातील असे वारंवार आपणाकडून सांगितले जाते. एमपीएसचीचा घोळ आणि सरळ सेवा भरतीचा घोळ हा कायम स्वरुपी चालू आहे. म्हणून या बाबतीत ठोस असा निर्णय घेऊन ही रिक्त असलेली संपूर्ण पदे भरण्यात येतील काय ?

यानंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी सांगितल्याप्रमाणे 587 पदे रिक्त आहेत हे खरे नाही. अपर जिल्हाधिकाऱ्याची 13 पदे, उप जिल्हाधिकाऱ्याची 10 पदे, तहसीलदाराची 144 आणि नायब तहसीलदाराची 222 अशी एकूण 389 पदे रिक्त आहेत. ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. सरळ सेवेतून निम्मी आणि पदोन्नतीच्या माध्यमातून काही पदे भरली जातात. 2012 मध्ये अतिरिक्त जिल्हाधिकारी संवर्गातून 48 लोकांना अपर जिल्हाधिकारी म्हणून पदोन्नती दिलेली आहे. उप जिल्हाधिकारी म्हणून तहसीलदार संवर्गातून 40 लोकांना पदोन्नती दिलेली आहे. तहसीलदार म्हणून नायब तहसीलदार संवर्गातून 87 लोकांना पदोन्नती दिली. अव्वल कारकून आणि मंडल अधिकारी संवर्गातून 558 लोकांना पदोन्नती दिली. अशाप्रकारे एकूण 773 लोकांना पदोन्नती देऊन रिक्त पदे भरण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचबरोबर सरळ सेवेतून पदे भरण्यासाठी मागणीपत्र वेळोवेळी पाठविलेले आहे.

सभापती महोदय, वर्ग 3 आणि 4 मध्ये तलाठी संवर्गातील पदे भरण्यासाठी कोणतेही बंधन नाही. जेवढी पदे रिक्त आहेत ती भरण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे. लिपिकाची पदे भरण्यासाठी 3 टक्क्याचे बंधन आहे हे मान्य आहे. परंतु विभागाच्या माध्यमातून हे बंधन उठविण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करीत आहोत, या प्रयत्नाला लवकरच यश येईल. माननीय सदस्यांचे म्हणणे सत्य असले तरी काही प्रमाणात पदे रिक्त आहेत, परंतु शासनाकडून सातत्याने पदे रिक्त राहू नयेत यासाठी प्रयत्न चाललेला आहे. 2012 मध्ये पदोन्नतीच्या माध्यमातून जी पदे भरण्यात आली त्याची आकडेवारी मी सभागृहाला सांगितली आहे. त्याचप्रमाणे 2013 मध्ये सुध्दा पदोन्नतीने पदे भरण्याचा कार्यक्रम सुरु आहे.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ प्रोसीजरसंबंधी**

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आजच्या विशेष बैठकीमध्ये एकूण 12 अर्धातास चर्चा विचारात घेण्यात येणार आहेत. हे आयुध वापरले जाते ते एखाद्या विषयाला अर्धातास चर्चा करण्यास वेळ मिळेल अशा हिशोबाने असते. आपल्यावर वेळेची बंधने आहेत याची मला कल्पना आहे. अधिवेशनाच्या सत्रामध्ये खूप महत्वाचे विषय चर्चेला येणार आहेत. प्रश्नोत्तरातून ज्या विषयाला न्याय मिळाला नाही असा विषय अधिक गांभीर्याने मांडण्यासाठी अर्धातास चर्चेचे आयुध माननीय सदस्यांकडून वापरले जाते.

आजच्या विशेष बैठकीमध्ये विचारार्थ असलेल्या अर्धातास चर्चेची संख्या आणि वेळ याचे कोष्टक विचारात घेतले तर 12 अर्धातास चर्चांसाठी दिलेला कालावधी विचारात घेता काही प्रमाणात अन्याय होण्याची शक्यता आहे. म्हणून माझी विनंती आहे की, ज्या अर्धातास चर्चा महत्वाच्या आहेत त्याबद्दल थोडा वेळ वाढवून द्यावा. वेळेअभावी जर चर्चा होऊ शकली नाही तर त्या अर्धातास चर्चा पुढील विशेष बैठकीमध्ये चर्चेसाठी घ्याव्यात, जेणेकरुन त्या विषयाला न्याय मिळेल. या दृष्टीने व्यवस्था करता आली तर जरुर विचार करावा ही विनंती आहे.

**उप सभापती** : ठीक आहे.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नाशिक जिल्हयातील देवस्थानाच्या जमिनींना अकृषिक परवानगी देताना अथवा विक्रीस शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नसल्याबाबत

**मु. शी.** : नाशिक जिल्हयातील देवस्थानाच्या जमिनींना अकृषिक परवानगी देताना अथवा विक्रीस शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नसल्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 35017 ला दिनांक 14 डिसेंबर, 2012 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.जयवंतराव जाधव,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, "नाशिक जिल्हयातील देवस्थानाच्या जमिनींना अकृषिक परवानगी देताना अथवा विक्रीस शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नसल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 35017 ला दिनांक 14 डिसेंबर, 2012 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, अनेक दिवसापासून प्रलंबित असलेल्या एका गंभीर विषयावर चर्चा उपस्थित करण्याची आपण मला संधी दिली त्याबद्दल मी आपला शतश: ऋणी आहे. गेल्या दोन वर्षापासून सातत्याने प्रश्नोत्तराच्या माध्यमातून आणि मंत्री महोदयांच्या दालनातील बैठकीच्या माध्यमातून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी प्रयत्न केला आहे. मी मंत्री महोदयांचे सुध्दा आभार मानतो. त्यांनी प्रत्येकवेळी वेळ देऊन या प्रश्नातून मार्ग काढण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, सदर अर्धातास चर्चेचा विषय देवस्थानच्या जमिनीच्या संदर्भात आहे. मी मंत्री महोदयांच्या नम्रपणे निदर्शनास आणू इच्छितो की, मनोली असेल, सिंगेबहुल असेल, तिरळशेत असेल, विहितगाव असेल किंवा बेलतगव्हाण असेल, या परिसरातील इतर जी काही गावे असतील या सर्व गावांच्या ज्या जमिनी आहेत या जमिनी देवस्थानाच्या जमिनी नाहीत. त्या मूळ शेतक-यांच्या मालकीच्या जमिनी आहेत. ज्यावेळी संबंधित देवस्थानाला मग ते ग्रामदेवता असेल किंवा बालाजी देवस्थान असेल, तेथील दिवाबत्ती करण्यासाठी जमिनीचा महसूल थेट देवस्थानाला





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव........

द्यावा असा निर्णय त्यावेळी घेण्यात आला होता. मध्यंतरीच्या काळात पूर आल्यामुळे काही कागदपत्रे पुराच्या पाण्यामध्ये वाहून गेली. मागील वर्षी मंत्रालयाच्या इमारतीला भीषण आग लागल्यामुळे महत्वाची कागदपत्रे जळून गेली. या घटना म्हणजे शेतकऱ्यांचे नशीब जळाल्यासारख्या आहेत का?

नंतर ओ.1....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव.....

असा प्रश्न मला पडतो.

या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांना मागच्या बैठकीत मी अतिशय विनम्रपणे सांगितले होते. सन 2003 साली जना पाटील या कक्ष अधिकाऱ्याने देवस्थान इनाम वर्ग 3 च्या जमिनीबाबत "देवस्थान इनाम 3" हा दर्जा बदलला जाणार नाही. या अटीच्या आधीन राहून या प्रकारच्या जमिनींच्या अकृषिक वापरास परवानगी देतांना अथवा विक्रीस शासनाच्या मान्यतेची आवश्यकता राहणार नाही. असे सांगितले होते व यासंदर्भात तशा प्रकारचा अध्यादेश सुध्दा काढण्यात आला होता. संबंधित शेतकऱ्यांना अकृषिक परवानगी देण्याच्या बाबतीत स्थानिक स्तरावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. परंतु जर एखादा शहा, ठक्कर, मेहता यांनी जमिनी घेतल्या व त्यांनी राज्य शासनाकडे अकृषिकची मागणी केली तर त्यांना अकृषिकची परवानगी दिली जाते. जाधव, चव्हाण,पाटील, नवले, पंडित यांची जमीन 1 एकर, दीड एकर, दोन एकर उरली असेल आणि त्यांनी शासनाकडे अकृषिकची मागणी केली तर ती परवानगी त्यांना दिली जात नाही.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांचा आदेश मी वाचून दाखवितो. त्यांनी आपल्या आदेशात असे म्हटले आहे की, "सदर गावातील जमिनीच्या अकृषिक परवानगी बाबत शासनाने यापूर्वी दिलेल्या सूचने नुसार जिल्हाधिकारी नाशिक यांनी कार्यवाही करावी असे आदेश देण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे. यास्तव मी खालील प्रमाणे आदेश देत आहे. वादी यांचे अपील मान्य करणे, जिल्हाधिकारी नाशिक यांनी शासन पत्र व सूचनाच्या बाबत विधी व न्याय विभागाच्या 2003 च्या अभिप्रायानुसार तसेच महाराष्ट्र जमीन अधिनियम 1966 च्या संदर्भात अन्य नियमांच्या आदेशाचे पालन करण्याच्या अटीच्या आधीन राहून अपिलातील मौजे.....(अमुक अमुक) यासंदर्भातील मिळकतीच्या अकृषिक परवानगी बाबत एक महिन्यात कार्यवाही करावी. खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत, सदर आदेश सर्व संबंधितांना कळविण्यात यावेत".

सभापती महोदय, आम्ही शेतकरी मूळ मालक आहोत. आमच्या जमिनीचा महसूल शासन दरबारी जमा व्हावा किंवा शासनाला वाटेल त्या ठिकाणी जमा करण्याचे अधिकार हे सर्वस्वी शासनाचे आहेत. परंतु आमच्या जमिनी आम्ही विकायच्या की नाहीत हा अधिकार आमचा असतांना त्यावर शासनाने निर्बंध का घालावे ? ..2..

श्री. जयवंतराव जाधव.....

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांचे धोरण अतिशय चांगले आहे. परंतु शासन याबाबतीत वेगळेच धोरण आखत आहे. या धोरणात्मक निर्णयाच्या बाबतीत देवस्थानाच्या जमिनीवर काही शेतकरी कूळ लागले आहेत. खरे म्हणजे यासंदर्भात शासनाने निश्चित असे धोरण करण्याची आवश्यकता आहे. मग हे धोरण गुजरात राज्याच्या, मध्यप्रदेश राज्याच्या धर्तीवर करायचे किंवा राज्य शासनाच्या स्वतःच्या धोरणानुसार करायचे याबाबतीत आमचे काही म्हणणे नाही. परंतु या ठिकाणचा आमचा मूळ मुद्दा अतिशय वेगळा आहे. या जमिनी मूळ शेतकऱ्यांच्या आहेत. या जमिनींचा महसूल शासनाने वाटेल त्या ठिकाणी द्यावा. परंतु देवस्थानाच्या दिवाबत्ती आणि रथोत्सवाकरिता महसूल देवस्थानच्या संस्थांना द्यावा असे आदेश आहेत. खरे म्हणजे या देवस्थानांना अशा प्रकारच्या महसुलाची गरज राहिलेली नाही. देवस्थानांना आता करोडो रुपयांचे उत्पन्न मिळत आहे. अशा जमिनींचे महसुली उत्पन्न तलाठी गोळा करीत आहे. महसुलाची आता देवस्थानाला गरज राहिलेली नाही. विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार माननीय मंत्री महोदयांनी अनेक चांगले निर्णय घेतलेले आहेत. त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात शासन आणि माननीय मंत्री महोदयांनी आमच्या शेतकऱ्यांच्या संदर्भात जो शब्द दिला होता तो शब्द, तो निर्णय पुन्हा द्यावा अशी अर्धातास चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : या विषयाकरिता दिलेला वेळ संपलेला आहे. तरी देखील मी सभागृहाची वेळ 15 मिनिटांकरिता वाढवित आहे.

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी नाशिक जिल्ह्यातील बेलदगव्हाण, मनोली, सावरगाव, विहीदगाव, शिंगवेबहुला आणि लहवित या गावातील जमिनी संबंधात महत्त्वपूर्ण अशी अर्धातास चर्चा उपस्थित केली आहे. त्यांनी यापूर्वीही वेळोवेळी निवेदन देऊन व बैठकीच्या माध्यमातून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. मी या निमित्ताने सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, देवस्थान इनामच्याबाबतीत सॉईल ग्रँट आणि रेव्हेन्यू ग्रँट हे दोन प्रकार आहेत. रेव्हेन्यू ग्रँटच्या माध्यमातून जमिनीच्या उत्पन्नातून देवस्थानच्या खर्चासाठी काही हिस्सा दिला जातो म्हणून या जमिनीवर पूर्णत: किंवा अंशत: सारा माफी दिली जाते. सॉईल ग्रँटच्याबाबतीत वेगळी परिस्थिती आहे. हा सारा वसूल करून इनामदारला म्हणजे देवस्थानला दिला जातो.

देवस्थान इनाम जमीन खालसा करण्यासाठी शासनाने तत्कालीन महसूल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 12.6.2001 रोजी समिती नेमली होती. त्या समितीने अहवाल तयार केलेला आहे. त्यातील काही बाबी मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे. या समितीने शिफारस केली आहे की, गुजरात राज्याने तयार केलेल्या कायद्यानुसार या राज्यातील देवस्थान इनाम संबंधी कायदा तयार करून खालसा करणे, वहिवाटदाराच्या ताब्यातील निम्मी जमीन वहिवाटदारास मालकी हक्काने देण्यात यावी, निम्मी जमीन देवस्थानला देण्यात यावी, ज्या व्यक्तीकडे देवस्थान जमिनीचा ताबा बेकायदेशीर आहे अशा जमिनीची बाजारभावाने किंमत निश्चित करून 50 टक्के देवस्थानाला देणे, देवस्थान इनामपैकी 50 टक्के जमीन वाटप करताना कमीतकमी एक एकर क्षेत्र वहिवाटदाराकडे राहील, कुळाचे हक्क देण्यासाठी कूळ कायदा व जमीन अधिनियम 1948 मधील 88 मध्ये सुधारणा करावी आणि शेत जमीन कमाल धारणा अधिनियम 1961 च्या तरतुदी देवस्थानास लागू करणे, अशा महत्त्वपूर्ण शिफारशी या समितीने केल्या आहेत.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके....

या संबंधातील फाईल आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांकडे देखील पाठविली होती. परंतु, मध्यंतरी मंत्रालयाला लागलेल्या आगीत संपूर्ण रेकॉर्ड नष्ट झाले. या समितीचा मूळ अहवाल होता तो देखील आगीत नष्ट झालेला आहे. परंतु, सुदैवाने त्याची एक झेरॉक्स प्रत आपल्याला सापडली आहे. याबाबत लवकरच एक बैठक आयोजित करण्यात येईल. या बैठकीच्या वेळी या समितीचे तत्कालीन अध्यक्ष व सदस्यांना बोलावून त्यांनी शासनाला दिलेला अहवाल प्रमाणित करून घेणार आहोत. त्यांनी अहवाल प्रमाणित केल्यानंतर शासनाला पुन्हा एकदा नस्ती सादर करण्यात येईल व त्यानुसार देवस्थान इनाम खालसा करण्यासंबंधातील कार्यवाही करता येईल. या समितीचा अहवाल आल्यानंतर परिस्थितीत नव्याने बदल झाला आहे. अनेक देवस्थानच्या जमिनी डी.पी.मध्ये आल्या आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर एन.ए.पोटेन्शियल प्राप्त झालेले आहे. साडेबारा टक्के परताव्यामध्ये देखील या जमिनी मोठ्या प्रमाणावर आलेल्या आहेत. त्याचे देवस्थान व वहिवाटदार याच्यामध्ये वाटप सूत्र काय असावे हे अद्याप पर्यंत ठरलेले नाही.

या अहवालाच्या बाबतीत परत एकदा सर्व सन्माननीय सदस्यांच्या ज्या काही सूचना असतील, त्यांची मत असतील ही विचारात घेऊन आपल्याला निर्णय घ्यावा लागणार आहे. यात तातडीने निर्णय व्हावा अशी सन्माननीय सदस्यांची अपेक्षा आहे. यात अनेक बाबी गुंतागुंतीच्या आहेत. हा संपूर्ण महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न आहे. हा प्रश्न केवळ नाशिक जिल्ह्या पुरता मर्यादित नाही. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये या कायद्याचे काय परिणाम होतील याचे निश्चित अनुमान आपल्याला काढावे लागणार आहे. त्यामुळे शासनस्तरावर हा प्रस्ताव विचाराधीन आहे. याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल. मात्र, याबाबत कुटल्याही प्रकारची कालमर्यादा शासनाला देता येत नाही अशीही स्पष्ट भूमिका आम्ही येथे व्यक्त करीत आहोत. तेव्हा सर्व सन्माननीय सदस्यांशी चर्चा करून लवकरात लवकर या प्रश्नासंबंधी मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, कालमर्यादा सांगता येत नाही असे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. स्थनिक स्तरावर अकृषिकला जिल्हाधिकारी परवाना देत होते. ते आपण डी-सेंट्रलाईझ करणार आहात काय ? त्यासंबंधी माननीय मंत्री आदेश देणार आहेत काय ?

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव....

मी माननीय मंत्री महोदयांना पुन्हा एकदा विनंती करतो की, सहा गावांतील शेतकरी मूळ मालक आहेत. देवस्थानच्या जमिनीवर कूळ नाही. त्या जमिनीचा सारा देवस्थानला द्यावा असे आदेश होते आणि आता त्या साऱ्याची देवस्थानला गरज नाही. आपण या संदर्भात जी गोष्ट फ्रेम करणार आहात त्यामध्ये या गावांचा वेगळ्या पध्दतीने विचार करणार आहात काय,तसेच अकृषक परवानगीसाठी खालच्या स्तरावर आदेश घेऊ देणार काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी या ठिकाणी सविस्तर उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात एक निवेदन देखील दिलेले आहे. त्या बाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी बाब सांगितलेली आहे त्याबाबत शासनाची कोणतीही आडकाठी नाही. विधी व न्याय विभागाने देखील त्या बाबत स्पष्ट निदेश दिलेले आहेत. तेव्हा हे प्रकरण तपासून कार्यवाही करण्यात येईल.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** :बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या भूसंपादनाची प्रकरणे प्रलंबित असणे

**मु.शी.** :बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या भूसंपादनाची प्रकरणे प्रलंबित असणे या विषयावरील तारां□त प्रश□ □मां□ 34162 ला दि□ां□ 21डिसेंबर, 2012 रोजी शास□ा□ दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यां□ी उपस्थित □ेलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. अमरसिंह पंडित ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या भूसंपादनाची प्रकरणे प्रलंबित असणे या विषयावरील तारां□त प्रश□ □मां□ 34162 ला दि□ां□ 21 डिसेंबर, 2012 रोजी शास□ा□ दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अ□ुमती□ □ि□म 92 अ□वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित □रीत आहे.

सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या भूसंपादना विषयीचा हा प्रश्न आहे. उत्तर देणारे मंत्री सुध्दा बीड जिल्ह्यातील असल्यामुळे भूसंपादनाच्या बाबतीतील प्रलंबित प्रकरणे लवकर निकालात निघतील अशी आशा बाळगण्यास हरकत नाही. सन 1975 पासून ही प्रकरणे प्रलंबित आहेत. शासनाने पाझर तलाव, सिंचन प्रकल्प अशा विविध कारणांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेतलेल्या आहेत. या प्रकरणी माननीय मंत्री महोदयांनी घेतलेल्या बैठकीमध्ये या प्रकरणांची पुन्हा नव्याने चर्चा होऊ लागली. जिल्हाधिकारी आणि उप जिल्हाधिकारी श्री.उबाळे यांच्या प्रयत्नामुळे ही सर्व प्रकरणे आता स्ट्रीमलाईन होताना दिसत आहेत. परंतु यामध्ये काही अडचणी आहेत. 18 चे अवॉर्ड नंतर फर्स्ट अपील अनिवार्य असणे आवश्यक नाही. परंतु आपणास लगेच फर्स्ट अपील दाखल करावे लागते. फर्स्ट अपील दाखल केल्यानंतर काय होते हे आपणास माहीत आहे. वास्तविक पाहता 18च्या ॲवार्डनंतर 28 डिसाईड करायला हवे. 28 डिसाईड केल्यानंतर प्रकरणे निश्चितपणे मार्गी लागतील अशी अपेक्षा आहे. संपादित संघाची प्रकरणे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित आहेत. ईजीएस संघाची साधारणत: दोन हजाराच्या आसपास प्रलंबित प्रकरणे आहेत. आज गोदावरी खोऱ्यांचा संपादित संघ वेगळा आहे. त्यांच्याकडील प्रलंबित प्रकरणे वेगळी आहेत. संपादित संघानी पैसे भरले नाहीत तर कन्टेम्प्ट ऑफ पीटीशन दाखल होते. संपादित संघाने पैसे

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित.....

भरले तर अनेक शेतकऱ्यांची प्रकरणे तिथल्या तिथे निकाली लागू शकतील. परंतु दुर्दैवाने असे अलीकडच्या काळात होताना दिसत नाही.

सभापती महोदय, कलम 11 मधील भूसंपादनाची प्रलंबित प्रकरणे 1310 आहेत. महामंडळाकडे 1 कोटी 54 लाख 85 हजार रुपयांच्या थकीत रकमेची 32 प्रकरणे प्रलंबित आहेत. महामंडळाने पैसे भरले नाहीत तर कन्टेम्प्ट ऑफ पीटीशन दाखल होईल. परंतु या कन्टेम्प्ट ऑफ पीटीशनमध्ये महामंडळाची गाडी जप्त होत नाही, खुर्ची जप्त होत नाही. तेव्हा संपादित संघाला हे पैसे भरण्यासाठी आदेश देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, आपण व्याजाचा विचार केल्यास आपणास जर एक रुपया द्यावयाचा असेल आणि तो दिला नाही तर ती रक्कम आठ, नऊ व दहा रुपयांपर्यंत जाते. तेव्हा या संदर्भातील निर्णय होणे गरजेचे आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना आढावा घेण्यास सांगावे. तसेच जी काही प्रलंबित प्रकरणे आहेत त्या बाबत धोरणात्मक निर्णय होणे गरजेचे आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

कलम 18 च्या ॲवार्डनंतर 28 डीसाईड करु शकलो तर निम्म्यापेक्षा अर्धी प्रकरणे मार्गी लागण्यास वेळ लागणार नाही. माननीय मंत्री महोदयांनी ही प्रकरणे तातडीने मार्गी लावण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी ड्राईव्ह घेऊन संपादित संघाकडे किती प्रकरणे आहेत, ईजीएस कडे किती प्रकरणे आहेत किंवा वेगवेगळ्या विभागांकडे किती प्रकरणे आहेत हे निश्चित केले तर ही प्रकरणे निकाली काढणे अतिशय सोयीचे होईल. मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करणार आहे की, संपादित संघाची किंवा जिल्ह्यातील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी टाईम बाऊंड प्रोग्राम आखून व जिल्हा स्तरावर एक बैठक आयोजित करुन कार्यवाही करण्यात येईल काय ?

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील भूसंपादनाच्या प्रकरणांसंदर्भात सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे बैठक घेण्यात येईल. त्या बैठकीला विभागाचे सचिव आणि इतर सर्व संबंधित अधिकारी उपस्थित राहून जी प्रकरणे प्रलंबित आहेत ती प्रकरणे कालबध्द मर्यादेत निकाली काढण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. मी सन्माननीय सदस्यांना संन्मानाने सांगू इच्छितो की, पूर्वीच्या आणि आताच्या परिस्थितीत खूप फरक पडलेला आहे. पूर्वी मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा निपटारा करण्याचे काम जिल्हा स्तरावर सुरु आहे. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांनी केलेल्या मागणीनुसार अधिवेशन संपल्यानंतर बीड येथे बैठक घेऊन त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात येईल.

श्री.अमरसिंह पंडित : महोदय, भूसंपादन अधिकाऱ्यांनी कलम 11 अंतर्गत शासनाकडे 6 कोटी 54 लाख 20 हजार 826 रुपयांची मागणी केली आहे. सदरहू रक्कम देण्याच्या हेतूने शासन तातडीने कार्यवाही करणार काय ?

श्री.प्रकाश सोळंके : महोदय, सन्माननीय सदस्य साधारणत: जुन्या पाझर तलावांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित करीत आहेत. ही जुनी प्रकरणे आहेत. ती नियोजन स्तरावर प्रलंबित आहेत. तरी सुध्दा त्यांच्याकडे पाठपुरावा करुन लवकरात लवकर हा निधी उपलब्ध व्हावा यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

**उप सभापती** : अर्धा-तास चर्चा संपलेल्या आहेत.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 11.45 वाजता पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 11.27 ते 11.45 पर्यंत स्थगित झाली.)

-------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**राज्यात कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या विविध मागण्यांबाबत**

**(१) * ३७०६७ डॉ. अपूर्व हिरे, श्री.सतीश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.एम.एम.शेख :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या वतीने विविध प्रलंबित १९ मागण्यांच्या पूर्ततेबाबत दिनांक २१ जानेवारी, २०१३ रोजी नाशिक येथे मोर्चा काढण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाचे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्रश्नी त्वरित निर्णय न घेतल्यास, आगामी इयत्ता १२ वीच्या परीक्षा विषयक कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा इशारा संघटनेने मा.मुख्यमंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक २१ जानेवारी, २०१३ रोजी निवेदनानुसार दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित मागण्यांच्या पूर्ततेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येणार आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदरहू मागण्यांपैकी काही मागण्याबाबत निर्णय झाला असून इतर मागण्या विचाराधिन आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ. अपूर्व हिरे : सभापती महोदय, या ठिकाणी काल बऱ्याच बाबतीत मार्ग निघालेला आहे परंतु माझे दोनच स्पेसिफिक प्रश्न आहेत. 1.1.1996 पासूनच्या डिफरन्सच्या बाबतीत जो विषय आहे त्याबाबत मंत्री महोदयांनी स्पष्ट करावे. ज्युनिअर कॉलेजच्या बाबतीत त्यांना पगारामध्ये तीन चार इन्क्रीमेंट कमी येतात त्या बाबतीत मंत्री महोदयांनी स्पष्ट करावे. 5 नोव्हेंबर, 2005 पूर्वी सेवेमध्ये आलेले जे शिक्षक आहेत, मग ते अंशात्मक अनुदानावर असतील किंवा टप्प्यात्मक अनुदानावर असतील, त्या सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करणार का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने 21 मागण्यांचे निवेदन दिनांक 1.2.2013 रोजी शासनाला सादर केले होते. त्यानंतर 5 तारखेला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37067 .... प्रा. फौजिया खान ....

माननीय उप मुख्यमंत्री आणि मंत्री महोदय यांच्यासोबत बैठक झाली. त्यानंतर अतिरिक्त मुख्य सचिवांकडे 16 तारखेला बैठक झाली. माननीय मंत्री आणि माझ्याकडे 27 तारखेला बैठक झाली. त्यानंतर माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्याकडे बैठक झाली. 13 तारखेला महासंघासोबत बैठक घेऊन त्यामध्ये असे ठरले की, त्यांच्या ज्या 3 मागण्या आहेत त्या ताबडतोब मंजूर कराव्यात आणि बाकीच्या ज्या 3 मागण्या आहेत त्यामध्ये त्रिस्तरीय वेतनश्रेणी, 42 दिवसांची संपकालीन रजा आणि विनाअनुदानितकडील सेवा वरिष्ठ आणि निवडश्रेणीसाठी पात्र धरण्याच्या बाबतीत आहे. यामध्ये फायनान्शिअल इम्प्लिकेशन्स आहेत. या बाबतीत दोन महिन्यांच्या आत योग्य निर्णय घेण्यात येईल असे ठरले आणि बाकीच्या ज्या मागण्या आहेत ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला, त्या सर्व मागण्यांबाबत तीन महिन्यांच्या आत योग्य निर्णय घेण्यात येईल असे त्यावेळी ठरले आणि त्यामुळे तो बहिष्कार मागे घेण्यात आला.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मघाशी या मागण्यांपैकी एक मागणी माननीय राज्यमंत्र्यांनी मान्य केली. प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक महिला शिक्षण सेवकांना 180 दिवसांची रजा लागू राहील असे मान्य केले आणि दोन तीन दिवसात त्याचा शासन निर्णय निर्गमित होईल असे सांगितले त्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. बऱ्याच दिवसांपासून कायम विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळांचा संप सुरु आहे. उच्च माध्यमिकचा 'कायम' शब्द काढावा आणि त्यांना अनुदान देण्यात यावे या बाबतीत निर्णय घेतलेलाच आहे परंतु सध्या त्यांचे आंदोलन सुरु आहे. त्या बाबतीत शासनाने ताबडतोब निर्णय घेऊन कायम शब्द काढला तर त्यांनाही दिलासा मिळेल. माननीय मंत्र्यांनी तीन महिने सांगितले. या बाबतीत शासन काय निर्णय घेणार आहे ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या मागण्यांमध्ये कायम शब्द काढण्यात यावा या मागणीचा सुध्दा समावेश आहे आणि त्या बाबतीत तीन महिन्यात योग्य निर्णय घेण्यात येईल हे मी या ठिकाणी स्पष्ट केले आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

ता. प्र. क्र. 37067 ....

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या मागण्यांच्या संदर्भात आदरणीय मंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. झालेल्या चर्चेनुसार त्यांनी ज्या मागण्या मान्य केल्या त्यामध्ये डी.एच.ई. धारकांच्या सेवाज्येष्ठतेचा विषय होता. त्या संदर्भातील आदेश शासनाने 19 मार्च, 2013 रोजी काढला. परंतु जो आदेश काढला त्यामध्ये शेवटच्या ओळीत "डी.एच.ई. धारकांना सेवाज्येष्ठता या आदेशाच्या दिनांकापासून" असा उल्लेख केलेला आहे. म्हणजे त्यांना आपण 19 मार्च, 2013 पासून सेवाज्येष्ठता दिलेली आहे. त्यांना नेमणुकीच्या दिनांकापासून, जेव्हापासून त्यांना मान्यता मिळालेली आहे तेव्हापासून सेवाज्येष्ठता द्यावी अन्यथा त्यांना काही उपयोग होणार नाही. यामध्ये त्यांची फसवणूक केल्यासारखे होईल. नेमणुकीच्या दिनांकापासून आणि मान्यतेच्या दिनांकापासून डी.एच.ई. धारकांना सेवाज्येष्ठता देण्याच्या संदर्भात शासन विचार करणार का ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37067...

प्रा.फौजिया खान : डी.एच.ई.चा जो निर्णय घेण्यात आला आहे तो प्रॉस्पेक्टिव्ह पध्दतीने घेण्यात आलेला आहे. सध्याच्या परिस्थितीमध्ये हाच निर्णय लागू आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत माहिती घेण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, 42 दिवसांच्या रजेसंबंधी शासनावर आर्थिक भार पडण्याचे कारण नाही. कारण ती रजा शिक्षकांनी भरुन दिलेली आहे. त्या वर्षीचे निकाल चांगले लागलेले आहेत. त्यामुळे त्या रजेची नोंद सेवा पुस्तकात करण्याबाबत काय अडचण आहे ? दुसरा प्रश्न असा आहे की, जे ज्युनिअर कॉलेजच्या आय.टी.शिक्षकांना वेतन मिळत नसल्यामुळे आय.टी.शिक्षकांसाठी वेतनाचे अनुदान दिले जाईल काय ?

प्रा.फौजिया खान : मी या शिक्षकांच्या मागण्यांचा उल्लेख केलेला आहे. त्यामध्ये याही मागणीचा समावेश आहे. यासंबंधी सुध्दा निर्णय घेण्यात येईल. आय.टी.शिक्षकांबाबतही सकारात्मक निर्णय घेण्याचा शासनाचा विचार आहे.

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, या कनिष्ठ महाविद्यालयांचा कायम हा शब्द काढला जाईल काय आणि शाळा सुरु झाल्यापासून पाचव्या वर्षी 100 टक्के अनुदान देणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, कायम शब्द काढण्याबाबत तीन महिन्याच्या आत योग्य निर्णय घेण्यात येईल.

श्री.भगवान साळुंखे : डी.एच.ई.धारकांना लाभ देण्याबाबत दि.19 मार्च च्या जी.आर.इश्यू झालेला आहे. डी.एच.ई.पात्रता बी.एड.च्या समकक्ष आहे. बी.एड.समजून केवळ त्यांना ज्युनिअर कॉलेजमधील आठ तुकड्यांच्या पुढे उपप्राचार्य पदासाठी नव्हे तर ते माध्यमिक शिक्षक असल्यामुळे त्यांना 'क' संवर्गात धरुन जेव्हा डी.एच.ई.प्राध्यापक झाला त्या तारखेपासून पूर्वलक्षी प्रभावाने 'क' संवर्गाचा लाभ दिला जाणार का ?

प्रा.फौजिया खान : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी असाच प्रश्न विचारला होता, त्यांच्या प्रश्नाला मी उत्तर दिलेले आहे.

-----

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औरंगाबाद येथे नॅशनल लॉ स्कूल स्थापन करण्याबाबत.**

**(2) * 37181 श्री.सतीश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.एम.एम.शेख : तारांकित प्रश्न क्रमांक 28466 ला दिनांक 26 मार्च, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) औरंगाबाद येथे नॅशनल लॉ स्कूल स्थापन करण्यासाठी सन 2009 मध्ये निर्णय होवून सुध्दा अद्याप ते सुरु होवू शकले नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, लॉ स्कूल सुरु करण्यास उशीर होत असल्याने मराठवाड्यातील आमदारांसह लॉ असोशिएशनचे पदाधिकारी आयुक्त कार्यालयासमोर उपोषणास बसणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, शासन या बाबतीत निर्णय घेवून माहे जून, 2013 पासून लॉ स्कूल सुरु करण्याबाबतची कार्यवाही करणार आहे काय,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे** : (1) होय

(2) होय

(3) व (4) औरंगाबाद येथे महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी स्थापन करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यत आला असता, मंत्रिमंडळाने चर्चा केली आणि सदर प्रस्ताव सर्वंकष तपासणी करुन फेर सादर करावा, असा निर्णय घेतला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदयांना लेखी उत्तरात दुरुस्ती करावयाची आहे का ?

श्री.राजेश टोपे : नाही.

श्री.दिवाकर रावते : नॅशनल लॉ स्कूल बाबत हा प्रश्न विचारला होता. परंतु उत्तरात नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी असे नमूद केलेले आहे. मंत्री महोदयांनी स्कूल व युनिव्हर्सिटीतील फरक समजावून सांगावा. त्यानंतर त्यांनी उत्तर द्यावे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, स्कूल व युनिव्हर्सिटी असे म्हणण्याची पध्दत आहे. परंतु त्यात कोणताही फरक नाही.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, नॅशनल स्कूल स्थापन करण्याबाबत मंत्रिमंडळाने निर्णय घेतला होता. 2011 मध्ये त्यासाठी 60 एकर जागा घेण्यात आली. आजपर्यंत 2 कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. परंतु अद्याप जी.आर.चा पत्ता नाही. या वर्षी तरी हे स्कूल सुरु केले जाईल काय आणि येत्या आठ दिवसात जी.आर.इश्यू केला जाईल काय ?

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37181.....

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये हा विषय प्रलंबित ठेवण्यात आला होता. परंतु काल माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मी सभागृहाला खात्री देऊ इच्छितो की, मुख्यमंत्री महोदयांनी सर्वांना हा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात यावा असे सांगितलेले आहे. त्यामुळे पुढील पहिल्या किंवा दुसऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये यासंबंधी निर्णय घेण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : मंत्री महोदयांनी नॅशनल लॉ स्कूल स्थापन करण्याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात येईल असे सांगितलेले आहे. संभाजीनगरला हे स्कूल स्थापन होणार आहे. या स्कूलसाठी जागा घेतली आहे का ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ ST/ D/ पूर्वी श्री. खंदारे 11:55

ता. प्र.क्र. 37181... डॉ. दीपक सावंत...

या विधी विद्यापीठासाठी बजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे काय ?

श्री. राजेश टोपे : या विद्यापीठासाठी केंद्र शासनाचे कोणत्याही प्रकारचे सहाय्य मिळणार नाही. केंद्र सरकारचा या विद्यापीठाशी कोणताही संबंध नाही. करोडी या ठिकाणी 50 एकर जागा या विद्यापीठाच्या नावे घेतलेली असून त्या जागेचा ताबा मिळालेला आहे. या जागेवर बांधकाम करण्यास दोन-तीन वर्षे लागू शकतील. तत्पूर्वी डीएड कॉलेजची जी मोठी इमारत तयार आहे त्यामध्ये म्यूट कोर्ट, शिकविण्यासाठी लागणारी दालने या सर्व गोष्टी तयार करण्यासाठी या वर्षीच्या बजेटमध्ये दीड कोटी प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. कोणत्याही परिस्थितीमध्ये ही रक्कम मार्च पर्यंत खर्च करण्याचा आमचा मानस आहे.

श्री. अमरनाथ राजूरकर : तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख व श्री. अशोक चव्हाण यांनी कॅबिनेटमध्ये यासंबंधीचा निर्णय घेतलेला आहे आणि त्यानंतर राष्ट्रीय विधी विद्यापीठ मंजूर झाले. या विद्यापीठासंबंधीचे निर्णय शासन ज्युडिशिअरीला घाबरुन बदलत आहे काय ?

श्री. राजेश टोपे : तसे काही नाही. मी खात्रीपूर्वक सांगू इच्छितो की, येणा-या कॅबिनेटमध्ये किंवा त्यानंतरच्या दुस-या कॅबिनेटमध्ये यासंबंधीचा निर्णय घेण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : मराठवाड्यावर हे आघाडी शासन सातत्याने अन्याय करीत आहे. आपले वजन तेथे कमी पडत आहे काय ? बाळाला आंगडे घेतले, टोपरे घेतले, बूट घेतले. पण बाळाचा जन्म कधी होणार आहे ? या विद्यापीठाला अद्याप मान्यता मिळालेली नसताना हे केले, ते केले असे मंत्री महोदय सांगत आहेत. तेव्हा पुढच्या एक दोन कॅबिनेटची वाट न पाहता आज कॅबिनेटची बैठक असेल तर आजच या विद्यापीठासंबंधी निर्णय घेऊन जून पासून विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल काय ?

श्री. राजेश टोपे : होय.

श्री. दिवाकर रावते : जागा ताब्यात घेऊन जागेचा विकास चालू आहे. या जागेवर वक्फ बोर्डाने दावा केलेला आहे, हे खरे आहे काय ?

श्री. राजेश टोपे : नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र.क्र. 37181...

श्री. हेमंत टकले : औरंगाबाद येथे नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी संबंध राज्यासाठी होणार आहे हे अपेक्षित आहे. यापूर्वी जेव्हा आरोग्य विज्ञान विद्यापीठ स्थापन झाले त्यावेळी इतर विद्यापीठामधून मेडिकल ॲडमिशन देणारी जी कॉलेजेस होती ती कॉलेजेस या विद्यापीठाला संलग्न होण्यासाठी तक्रार करीत होती, कुरकुर करीत होती. त्यावेळी मुंबई विद्यापीठ अधिक सधन आहे आणि अधिक तंत्रज्ञान तेथे उपलब्ध आहे त्यामुळे आम्हाला मुंबई विद्यापीठाशी संलग्न राहू द्यावे अशी मेडिकल कॉलेजेसची मागणी होती. आपण मराठवाडयातील औरंगाबाद सारख्या ठिकाणी संबंध राज्याची युनिव्हर्सिटी स्थापन करताना राज्यातील सर्व विधिविषयक महाविद्यालये या विद्यापीठाच्या अंतर्गत येणार आहेत काय ? तसे नियोजन केलेले आहे काय ?

श्री. राजेश टोपे : हे विद्यापीठ अफिलिएटेड स्वरुपाचे होणार नाही तर ते युनिटरी स्वरुपाचे होणार आहे. कोणत्याही विधी महाविद्यालयाचे संलग्नीकरण या विद्यापीठाशी नसेल. हे स्वतंत्र युनिटरी स्वरुपाचे विद्यापीठ होणार आहे. सगळया विद्यापीठामध्ये जी जी विधी महाविद्यालये आहेत ती त्या त्या विद्यापीठाशी संलग्न राहातील.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तारांकित प्रश्न क्र.36683 संबंधी**

**सभापती** : तारांकित प्रश्न क्रमांक 36683 ला दिलेल्या उत्तराचे प्रारुप थोडेसे चुकीचे आहे, ते प्रारुप मी तपासून घेईन व हा प्रश्न नंतर चर्चेसाठी घेण्यात येईल.

श्री.विक्रम काळे :सभापती महोदय, ठीक आहे.

---------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील माध्यमिक शाळांमधील पायाभूतपेक्षा वाढीव पदांना मान्यता देण्याबाबत**

**(4) * 38031 श्री.रामनाथ मोते, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे, श्री.नागो गाणार, श्री.वसंतराव खोटरे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतीश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक 34920 ला दिनांक 20 डिसेंबर, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात.** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील माध्यमिक शाळांमधील सुमारे 918 पदांना संयुक्त सचिव समितीने मान्यता दिल्यानंतर हा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीसमोर केंव्हा सादर करण्यात आला होता,

(2) सदर उच्चस्तरीय समितीने वाढीव पदांबाबत काय निर्देश दिले आहेत,

(3) उच्चस्तरीय समितीच्या निर्देशानुसार शालेय शिक्षण विभागाने कार्यवाही व पाठपुरावा केला आहे काय ?

**प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1), (2) व (3) राज्यातील माध्यमिक शाळांमधील शिक्षक संवर्गातील 918 पदांचा प्रस्ताव चक्रीय पध्दतीने उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्याकरीता वित्त विभागास पाठविण्यात आला असता वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांची माहिती क्षेत्रीय यंत्रणेकडून प्राप्त करुन प्रस्ताव पुन्हा वित्त विभागास सादर करण्यात येत आहे.

श्री.रामनाथ मोते : माध्यमिक शाळांमधील वाढीव पदांच्या संदर्भातील हा विषय आहे. या संदर्भात शासनाने दिनांक 17.72012 रोजी उत्तर दिले होते की, यास सचिव समितीने मान्यता दिलेली आहे. अशी मान्यता दिलेली पदांची संख्या 918 एवढी आहे. या प्रश्नाच्या उत्तरात शासनाने असे म्हटले आहे की, यासंदर्भातील प्रस्ताव वित्त विभागाकडे गेल्यानंतर वित्त विभागाने काही त्रुटी काढलेल्या आहेत. वित्त विभागाने काय त्रुटी काढलेल्या आहेत, या त्रुटीची पूर्तता शासनाने केलेली आहे काय ? मी त्या दिवशी मूलभूत प्रश्न उपस्थित केला होता. दिनांक 26 मार्च, 2002 चा शासन निर्णय आहे, त्या शासन निर्णयामध्ये पायाभूतची जी पदे आहेत. ही पायाभूतीची पदे गृहीत धरताना त्या लेखाशीर्षाखाली येणारी संपूर्ण राज्याची पदे गृहीत धरावी असे म्हटलेले आहे. माध्यमिकची पदे 0442 या लेखाशीर्षाखाली येणारी पदे आहेत. 2003 ची पायाभूतची पदे आणि ही

3...



ABG/ KTG/ ST/ प्रथम श्री.शिगम 12:00

वाढीव पदे यांची संख्या किती आणि यामध्ये किती फरक आहे, यासंबधीची माहिती माननीय मंत्री महोदय सांगू शकतील काय? कोणत्याही सचिव समिती समोर किंवा उच्चस्तरीय समिती समोर जाण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे आपण आपल्या स्तरावर निर्णय घेण्याच्या संदर्भात विचार करणार आहात काय?

प्रा.फौजिया खान : संयुक्त सचिव समितीने 918 पदांना मान्यता दिलेली आहे आणि ही बाब उच्चस्तरीय समितीसमोर गेलेली आहे. त्यांनी वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविला, वित्त विभागाने माहिती मागितलेली आहे. वित्त विभागाने त्रुटी काढलेल्या नाहीत. त्यांनी माहिती मागितलेली आहे. 918 शिक्षकीय पदांचा सस्थानिहाय व नेमणुकीचा तपशील या पध्दतीची माहिती वित्त विभागाने मागितलेली आहे. पटपडताळीचा त्याच्यावर परिणाम होतो काय, वेतन अदा करण्यात येते की नाही अशाही पध्दतीची माहिती त्यांनी मागितलेली आहे. ही माहिती सादर करण्यात येत आहे. आम्ही उच्च माध्यमिकच्या बाबतीत आश्वासित केलेले आहे की, माध्यमिक आणि उच्च माध्यमिकच्या बाबती येत्या तीन महिन्यात योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

डॉ.सुधीर तांबे : माननीय मंत्री महोदयांना मागच्या अधिवेशनात हा प्रश्न विचारला गेला होता. त्यावेळी याबाबतीत एक महिन्यात निर्णय घेण्यात येईल असे सांगितले होते. परंतु आता तीन महिन्याच्या कालावधी दिला जातो आहे. ही पदे चार-पाच वर्षापासून निर्माण झालेली आहेत. ही पदे नैसर्गिक वाढीमुळे व विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार निर्माण होतात. चार-चार वर्षे ती पदे निर्माण केली जात नाहीत. खरे म्हणजे त्याच वर्षामध्ये ही पायाभूत पदे मंजूर करण्याचे शासन स्पष्टपणे धारेण घेईल काय?

प्रा.फौजिया खान : पद निर्मितीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती निर्माण केली गेली आहे. अशा पध्दतीचे निर्णय घेण्याचे अधिकार त्या समितीला आहेत. पदे निर्मितीची ही बाब आहे. या संपूर्ण गोष्टी त्या उच्चस्तरीय समितीमध्ये ठरविल्या जातात. सदर पदाच्या बाबतीत त्या स्तरावर ठरणे अपेक्षित आहे, यासंदर्भातील प्रक्रिया चालू आहे.

श्री.भगवान साळुंखे : विद्यार्थ्यांची संख्या वाढते त्या नुसार ही पदे वाढतात. ती पदे मान्यतेसाठी मंत्रालयीन स्तरावर येतात. शालेय शिक्षण विभागाने वित्त विभागाला फाईली सादर

4...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

केल्यानंतर वित्त विभागाचे अधिकारी अशा काही टिपण्या ठेवतात. अशा प्रस्तावास आमची मान्यता घेतली आहे काय ? अशा प्रस्तावास मंत्रिमंडळाने मान्यता दिली असेल तर वेगळी मान्यता घेण्याची गरज आहे काय, तशी गरज नसेल तर वित्त विभागाच्या कपोलकल्पित टिपण्या करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात येईल काय ?

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ गितेनंतर 12:05

ता.प्र.क्र.38031......

प्रा.फौजिया खान : या पदांबाबत मंत्रीमंडळाची मान्यता घेण्यात आलेली नाही. हा विषय उच्चस्तरीय समितीकडे आहे हे मी यापूर्वी सांगितले आहे. हा पदे निर्मितीचा विषय असल्यामुळे हे करणे गरजेचे आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मी तांत्रिक मुद्दा उपस्थित करु इच्छितो. प्रत्येक वेळी या सभागृहात प्रश्न विचारल्यानंतर मंत्री महोदयांकडून उच्चस्तरीय समिती किंवा अन्य कोणत्या तरी समितीचा रेफरन्स दिला जातो. कोणत्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली किती समित्या नेमलेल्या आहेत आणि ते सचिव त्या समितीचे काम कसे करतात याची माहिती या सभागृहासमोर येऊ द्या. वेगवेगळया समित्या स्थापन केलेल्या आहेत, त्यामुळे सचिवांना त्या समितीचे काम करायला वेळ मिळत नाही आणि निर्णय घेण्यास वेळ लागतो हे खरे आहे काय?

प्रा.फौजिया खान : समिती कोणत्या विभागाची आहे, किती समित्या आहेत ही माहिती मी देऊ शकत नाही. ज्या गोष्टीसाठी उच्चस्तरीय समिती नेमली आहे, त्या समितीपुढे हा विषय विचारार्थ आहे एवढेच सांगू इच्छिते.

**सभापती** : मंत्री महोदया, मी आपल्याला सूचित करतो की, माननीय सदस्यांनी शिक्षण विभागाशी संबंधित वेगवेगळया उच्चस्तरीय समित्या किती आहेत असा प्रश्न विचारला आहे. या प्रश्नाशी त्याचा संबंध नसला तरी अशा उच्चस्तरीय समित्या किती आहेत याची माहिती पटलावर ठेवण्यास हरकत नसावी.

प्रा.फौजिया खान : होय.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, हा प्रश्न फक्त 918 पदांबाबतचा आहे. सभागृहात हा प्रश्न 9 ते 10 वेळा उपस्थित झालेला आहे. प्रत्येक वेळी मंत्री महोदयांकडून असे उत्तर दिले जाते की, वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करुन त्यावर किती दिवसात निर्णय घेण्यात येईल?

प्रा.फौजिया खान : संपूर्ण निर्णय तीन महिन्यात घेण्यात येईल असे मी सांगितले आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी मूलभूत प्रश्न विचारला होता. या प्रस्तावाच्या संदर्भात शासन चुकीच्या धोरणाचा अवलंब करीत आहे का? शासनाचा निर्णय अगदी स्पष्ट आहे. 2003 ची पायाभूतची पदे आणि 2001 पासूनची म्हणजे 13 वर्षापूर्वीच्या 918 पदांना अद्याप.......

...2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते........... ता.प्र.क्र.38031.....

मान्यता दिली जात नाही. याबाबत समितीसमोर जाण्याची आवश्यकता आहे का? हा निर्णय संचालक स्तरावर होऊ शकतो. पायाभूत पदे आणि वाढीव पदे यांची तुलना केली तर आजही पायाभूत पदापेक्षा माध्यमिक शिक्षक कमी वेतन घेत आहेत. असे असताना उच्चस्तरीय समितीकडे न जाता संचालक स्तरावर फेरविचार करुन निर्णय का घेतला जात नाही?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, असे होऊ शकत नाही. पदे निर्मितीचा विषय आहे त्यामुळे शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आम्ही वारंवार या संदर्भात सभागृहात प्रश्न उपस्थित केल्यानंतर 'उच्चस्तरीय समितीपुढे जाणार आहोत' असे एकाच प्रकारचे उत्तर मंत्री महोदयांकडून दिले जाते. आम्ही शिक्षक असल्यामुळे मंत्री महोदयांच्या उत्तरावर विश्वास ठेवत असतो. आजपासून किमान तीन महिन्यात या विषयासंबंधीचा शासन आदेश काढला जाईल काय?

प्रा.फौजिया खान : प्रयत्न आमचा हा आहे की, तीन महिन्यात शासन निर्णय काढण्यात यावा.

-------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील जाती व्यवस्था नष्ट करण्याकरिता शाळेच्या दाखल्यावर जात नोंदविण्याची सक्ती न करण्याबाबत**

**(५) * ३७८१२ श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.संजय दत्त, श्री.मोहन जोशी, श्री.एम.एम.शेख, श्री.सुभाष चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जाती व्यवस्था नष्ट करण्याकरिता शाळेच्या दाखल्यावरुन जात हद्दपार करा ही मागणी जनतेच्या चर्चेत असतानाच प्रत्यक्षात शाळेत नाव नोंदविताना जात सांगण्याची कोणतीही सक्ती नसल्याचा खुलासा शिक्षण विभागाने केल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना सवलती देतांना गोंधळ होऊन विद्यार्थ्यांचे फार मोठे नुकसान होणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थ्यांना सवलती मिळण्यासाठी शासनाची भूमिका काय आहे व यावर शासन कोणती उपाययोजना वा कार्यवाही करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) विद्यार्थ्यांना सवलती मिळण्यासाठी शासनाच्या प्रचलित योजना सुरू आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, शाळेत नाव नोंदताना जात सांगण्याची आवश्यकता नसल्याचा खुलासा शालेय शिक्षण विभागाने केला आहे. हे खरे नाही. वास्तविकता अशी आहे की, यामुळे मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय, भटक्या व विमुक्त जाती, अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांवर फार मोठा अन्याय होणार आहे. शासनाच्या विविध योजनांच्या सवलतींपासून किंवा लाभापासून हे विद्यार्थी वंचित होणार आहेत. प्रांत अधिकाऱ्यांकडून जातीचे प्रमाणपत्र दिले जात असताना शाळेचा दाखला पुरावा म्हणून ग्राह्य धरला जातो.

नंतर एक्स.1...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 37812......

श्री संजय दत्त ......

यामुळे पालकांमध्ये जो गैरसमज निर्माण झाला आहे तो दूर करण्यासाठी शासन योग्य तो फेर खुलासा करणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या पध्दतीचा कोणताही खुलासा शालेय शिक्षण विभागाकडून झालेला नाही. शाळेच्या रेकॉर्डमध्ये जातीचा उल्लेख करणे आवश्यक असून शाळेच्या रेकॉर्डमध्ये जातीचा उल्लेख करणे यापुढेही आवश्यक राहणार आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, शाळेच्या दाखल्यावर जातीचा उल्लेख होता कामा नये यासाठी शासन निर्णय घेणार आहे काय ? यामध्ये सवलतीचा संबंध आपण म्हणत असाल तर शाळेच्या दाखल्यावरुन विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची सवलत मिळत नाही. जातीचा फायदा देण्याची पध्दत पूर्णपणे वेगळी आहे. त्यामुळे शाळेच्या दाखल्यावर जातीचा उल्लेख होणार नाही याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, विद्यार्थ्यांना जातीच्या उल्लेखावरुनच सवलत दिली जाते. त्यामुळे शाळेमध्ये प्रवेश घेतांना जातीचा उल्लेख होणे आवश्यक आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, विद्यार्थ्यांना जातीच्या दाखल्यावरुनच पुढे जाण्याची सवलत मिळत असते. काही खाजगी संस्था केवळ हिंदू, मुस्लीम, शीख व इसाई या चार जातीच मान्य करतात. परंतु ही मुले जेव्हा कॉलेजमध्ये प्रवेश घेतात तेव्हा त्यांना जातीचे प्रतिज्ञापत्र द्यावे लागते. त्यामुळे अशा खाजगी संस्थेच्या शाळेतील प्रवेशाच्या वेळी जातीचा उल्लेख केला जाणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, शाळेमध्ये जेव्हा मुलाचा प्रवेश होतो तेव्हा ॲडमिशन रजिस्टर व जनरल रजिस्टरमध्ये धर्माचा नाही तर जातीचा उल्लेख होणे आवश्यक आहे. जेव्हा विद्यार्थी शाळा सोडतो तेव्हा त्या शाळा सोडण्याच्या दाखल्यामध्ये सुध्दा जातीचा उल्लेख होणे आवश्यक असतो. माध्यमिक शाळा संहिता नियम 83 अन्वये जातीचा उल्लेख करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 37812......

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या प्रश्नाच्या निमित्ताने जातीय व्यवस्थेच्या संदर्भात शासन म्हणून आणि राज्यकर्ते म्हणून आपला काय दृष्टिकोन असला पाहिजे याची चर्चा सभागृहात होणे आवश्यक आहे. या जाती व्यवस्थेमुळे समाजा समाजात अंतर निर्माण होते व त्यामुळे मोठया संघर्षाला लोकांना सामोरे जावे लागते. खरे म्हणजे या संघर्षाची सुरुवात शाळेच्या दाखल्यापासूच होत असते. त्यामुळे एखादा निर्णय सामाजिक दृष्टया आवश्यक असतो तो घेतला जाण्याची आवश्यकता असते. शाळेच्या दाखल्यावरुन जात हद्दपार केली तर त्याचे समाजात चांगले परिणाम सुध्दा घडू शकतील. विद्यार्थ्यांना स्कॉलरशिपची जी काही सवलत द्यावयाची असते त्यासंदर्भात आपल्याला वेगळया पध्दतीने विचार करता येऊ शकतो. त्यामुळे शाळेच्या दाखल्यावरुन जातीचा उल्लेख काढण्याच्या संदर्भात शासनामार्फत विचार केला जाणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, शाळेच्या दाखल्यावर जातीचा उल्लेख न करण्याचा विचार शासनासमोर नाही. विद्यार्थ्यांना सवलती देण्यासाठी शाळेच्या दाखल्यावर जातीचा उल्लेख करणे आवश्यक असून ही तरतूद ॲक्ट प्रमाणे करण्यात आलेली आहे.

**सभापती** : या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांना कितीही उप प्रश्न विचारण्याची संधी दिली तरी सदस्यांचे समाधान होईल असे मला वाटत नाही. या प्रश्नाला न्याय देण्यासाठी मी एक तास चर्चा घेण्याचे ठरविले असून यासंदर्भातील वेगळी चर्चा येत्या दोन चार दिवसात घेण्यात येईल.

-------

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील कापड बाजार आणि दुकानातील हातगाडी कामगारांच्या सह्याद्रीनगर येथील घरांचे बेकायदा हस्तांतरण करून केलेला भ्रष्टाचार**

**(६) * ३७२०२ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.दिपकराव साळुंखे, श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.रमेश शेंडगे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विनायक राऊत, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुभाष चव्हाण, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कापड बाजार आणि दुकाने मंडळातील हातगाडी कामगारांच्या घरांसाठी शासनाने मुंबईतील कांदिवली चारकोप येथे दिलेल्या भूखंडावर सहयाद्रीनगर येथील वसाहतीत बांधण्यात आलेल्या ३०० घरांचे बेकायदेशीर हस्तांतरण एका शासकीय अधिकाऱ्यांनी माहे मे, २०१२ मध्ये करून लाखो रूपयांचा भ्रष्टाचार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आहे व तद्नुसार संबंधितांविरूध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ** : (१) नियमबाह्य हस्तांतर केले हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी सह कामगार आयुक्त यांच्याकडून चौकशी करण्यात आली असून त्यामध्ये कापड बाजार आणि दुकाने मंडळाच्या नोंदीत कामगारांव्यतिरिक्त इतरांना सदनिका हस्तांतरित केल्याचे आढळून आले आहे .त्यामुळे मंडळाच्या तत्कालीन अध्यक्षांनी दिनांक २८.५.२०१२ रोजी केलेला एक सदस्यीय मंडळाचा ठराव व २९३ सदनिकांचे हस्तांतरण रद्द करण्यात आले आहे. सदनिकांचे नियमबाह्य हस्तांतरणास जबाबदार असलेल्या मंडळाच्या तत्कालीन अध्यक्ष व सचिवांविरुद्ध विभागीय चौकशीची कारवाई सुरु करण्याबाबत कामगार आयुक्तांना आदेश देण्यात आले आहेत. तत्कालीन सचिवांना निलंबित का करु नये याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने या प्रश्नाच्या उत्तरात पुढील सुधारणा करतो.

प्रश्न क्रमांक २,३ व ४ च्या उत्तरामध्ये "कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे" या ओळीनंतर "तसेच सदर प्रकरणाचा गुन्हे अन्वेशन शाखेकडून चौकशी करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे" असे वाचावे.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, यामध्ये जे अधिकारी होते ते आता निवृत्त झाल्यामुळे हे प्रकरण आपण गुन्हे अन्वेशन विभागाकडे दिले आहे काय ?

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37202....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, श्री.निकम हे अध्यक्ष होते. त्यांनी रिटायर्ड होण्याच्या आधी 1-2 दिवस आधी ठराव करून सदनिका वर्ग केल्या आहेत. याप्रकरणी एक-दोन लोकांना म्हणजे सचिव इत्यादींना निलंबित करण्याची कारवाई केली आहे. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करावयाची असल्याने ती गुन्हे अन्वेषण शाखेकडे सोपविण्यात आली आहे. श्री.निकम हे सेवानिवृत्त झाले असले तरी गुन्हा माफ होणार नाही. त्यामुळे आपण सदर चौकशी गुन्हे अन्वेषण विभागाकडून करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, माथाडी कामगारांची सर्वात पहिली सह्याद्री गृहनिर्माण सहकारी संस्था, चारकोप, मुंबई येथे आहे. या वसाहतीतील मूळ माथाडी कमी झालेले आहेत. या सहकारी संस्थेत बाहेरचे लोक जास्त आलेले आहेत. 293 सदनिका बेकायदेशीरपणे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत. त्या आता नियमबाह्य ठरविलेल्या आहेत. ज्यांनी या सदनिका विकत घेतल्या आहेत, त्यांना निष्कासित करण्यात करून या सदनिका शासनाने स्वत:च्या ताब्यात घेतल्यानंतर पुन्हा माथाडी कामगारांनाच देण्यात येणार आहेत काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, एकूण 343 सदनिका हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला होता. त्याबाबतची चौकशी आमच्या आयुक्तांनी केली होती. त्यापैकी 293 सदनिका या नोंदीत कामगार नसलेल्या लोकांना म्हणजे बाहेरच्या लोकांना दिलेल्या होत्या. त्या रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. याच प्रश्नासंबंधी खालच्या सभागृहात चर्चा झाली होती. त्यावेळी हे प्रकरण गुन्हे अन्वषण शाखेकडे दिले तरच खऱ्या अर्थाने चौकशी होईल. कामगार विभाग चौकशी करू शकणार नाही, असे मत व्यक्त करण्यात आले. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी गुन्हे अन्वेषण शाखेकडे दिलेली आहे. ज्यांचा माथाडी कामगारांशी काहीच संबंध नाही अशा लोकांना 293 सदनिका हस्तांतरित केल्या आहेत त्या काढून घेण्यासाठी तसेच जे खरे माथाडी कामगार आहेत त्यांना ही घरे मिळण्यासंबंधी आमचा विभाग निश्चितपणे प्रयत्न करील.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हा माथाडी कामगारांच्या घरांच्या संबंधातील प्रश्न आहे. शासनाने जी पावले उचलली आहेत त्या हेतूबद्दल आमच्या मनात अजिबात शंका नाही. एक सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली होती. त्यात तो दोषी असल्याचे सिद्ध झालेले आहे. त्यामुळे माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. आपण गुन्हे अन्वेषण विभागाकडे चौकशी कुठल्या कलमाखाली दिली आहे ? शासकीय सेवेत असलेल्या अधिकाऱ्या विरूद्ध तसेच सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याविरूद्ध गुन्हा दाखल केल्यानंतर त्यांच्याकडे वेगळ्या वेगळ्या नजरेने पाहिले जाते काय, गुन्हे अन्वेषण शाखेकडे कोणत्या कलामान्वये गुन्हा दाखल झाला आहे व त्याची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कलम आपण लावत नाही. कलम लावण्याचा अधिकर गुन्हे अन्वेषण विभागाला आहे. त्याने जी फसवाफसवी केली आहे त्याची चौकशी करून ते कलम लावतील. एक सदस्यीय बोर्डाने कुठल्याही प्रकारचा धोरणात्मक निर्णय घेऊ नये अशा प्रकारचे वारंवार आदेश काढलेले असतानाही आर्थिक लाभापोटी हे केलेले आहे. त्याला शिक्षाही झालीच पाहिजे. त्यासाठी त्याचा प्रॉव्हीडंट फंड, ग्रॅज्युईटी आम्ही गोठवणारच आहोत. त्याशिवाय त्याला तुरूंगातसुद्धा पाठवावे लागेल.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, अधिकाऱ्यांवर कारवाई होईल त्याबद्दल प्रश्नच नाही. ज्या कर्मचाऱ्याने सदनिका देण्यासंबंधी खोटी कागदपत्रे तयार केली असतील, ज्या दलालांनी माथाडी बोर्डाच्या चेअरमनला मध्यस्थी घालून अशा प्रकारे गैरप्रकार केले असतील तर त्यांच्या विरूद्ध देखील शासन कारवाई करणार आहे काय, त्याच बरोर त्यासाठी काही कालमर्यादा राहणार आहे काय ? तसेच या घरांचे वाटप जुन्या माथाडी कामगारांना करण्यात येणार आहे की, विद्यमान कार्यरत असलेल्या माथाडी कामगारांना करण्यात येणार आहे ? अशा प्रकारे माझे तीन स्पेसिफिक प्रश्न आहेत.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37202...

श्री.प्रकाश सोळंके :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री भाई जगताप, विनायक राऊत आणि नरेंद्र पाटील ही कामगार चळवळीमध्ये काम करणारी नेते मंडळी आहेत. माझी त्यांना विनंती आहे की, त्यांच्याकडे दलाला सबंधीची किंवा जी काही माहिती असेल ती माहिती मला दिल्यास मला ती सीआयडीकडे देता येईल. नव्याने नोंदणी झालेल्या कामगारांना आणि सेवा ज्येष्ठतेनुसार असलेल्या कामगारांना घरे देण्यात येतील.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये जे परप्रांतीय लोक येतात त्यांना आपण घरे देतो. मुंबईमध्ये महाराष्ट्रातून हजारो कामगार येऊन आपल्या परिश्रमातून घाम गाळून मुंबईला देशाची आर्थिक राजधानी बनवितात अशा कामगारांना हक्काची घरे देणे शासनाचे आद्य कर्तव्य आहे असे मला वाटते. सिडकोच्या बाबतीत दहा हजार घरे देण्याचा निर्णय झालेला आहे. पण त्याबाबत कोणत्याही प्रकारची अंमलबजावणी होताना दिसत नाही. तेव्हा सिडकोच्या बाबतीत जो निर्णय झालेला आहे त्याची अंमलबजावणी केव्हा करणार आहात ? प्रत्येक कामगार संघटनांना त्या त्या प्रमाणात टक्केवारी दिलेली आहे. महाराष्ट्राकडे रजिस्टर्ड असलेल्या माथाडी बोर्डातील सर्व कामगारांना घरे देणार आहात काय आणि त्याची अंमलबजावणी केव्हा करणार आहात ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न वेगळा आहे.

**सभापती** :सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न मूळ प्रश्नांशी संबधित नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु माननीय मंत्री महोदयांनी त्या संदर्भातील माहिती पटलावर ठेवावी.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न नगर विकास विभागाशी संबंधित आहे. त्याचा कामगार विभागाशी काहीही संबंध नाही. तरी देखील प्रयत्न करण्यात येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, दलालांची माहिती कामगार नेत्यांना असेल तर त्यांनी ती द्यावी. मला ते थोडेसे योग्य वाटत नाही. कारण 293 सदनिकांमध्ये राहत असलेल्या सदनिकाधारकांनी सादर केलेली कागदपत्रे असत्य स्वरुपाची आहेत असा अहवाल एक सदस्यीय समितीने दिलेला आहे. त्यानुसार आपण कारवाई

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37202...

श्री.भाई जगताप....

देखील केलेली आहे. तेव्हा 293 सदनिंकामध्ये जे बोगस लोक राहत आहेत त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करावी तसेच ज्यांनी बनावट कागदपत्रे तयार करुन 293 जणांना फसविले आहे त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या प्रकरणाचा संपूर्ण तपास सी.आय.डी.कडे दिलेला आहे. 293 सदनिकांचे हस्तांतरण रद्द करण्यास कामगार आयुक्तांना सांगण्यात आले आहे. तसेच सदनिकाधारकांनी जी कागदपत्रे सादर केली आहेत ती सत्य की असत्य आहेत याची चौकशी करण्याचे काम कामगार विभाग करेल. ही घरे कामगारांसाठी आहेत हे 293 सदनिकाधारकांनी समजून घेण्याची आवश्यकता होती. या प्रकरणी श्री.निकम, अध्यक्ष हे जबाबदार आहेत तसेच 293 लोक देखील जबाबदार आहेत. त्यांनी घाम गाळणाऱ्या, कष्टकरी कामगारांच्या घरांचा ताबा घेण्यासाठी प्रयत्न करावयास नको होता. या प्रकरणाची चौकशी गुन्हा अन्वेषण विभागामार्फत करण्यात येईल.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील मुख्याध्यापकांच्या विविध मागण्यांबाबत**

**(७) * ३८१३७ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुख्याध्यापकांवरील वाढत्या जबाबदाऱ्या लक्षात घेऊन त्यांना अधिकची वेतनश्रेणी तसेच धावपळ भत्ता सुरु करण्याबाबत आणि त्यांच्यावरील शिकवण्याच्या तासांचा वर्कलोड कमी करण्याबाबत मुख्याध्यापक संघटना आणि शिक्षक भारतीकडून मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत काय कार्यवाही केली आहे,

(३) सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे मुख्याध्यापकांना वेतनश्रेणी न देण्यामागील अडचणी काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१), (२) व (३) मुख्याध्यापकांना सहाव्या वेतन आयोगापेक्षा अधिकची वेतनश्रेणीबाबतची मागणी होत असून त्याबाबत वेतनत्रुटी समितीने प्रस्ताव अमान्य केला आहे. धावपळ भत्ता किंवा वर्कलोड कमी करण्याबाबत कोणतीही मागणी अप्राप्त आहे.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत )

-------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशनबाबत**

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, काल या सभागृहात दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांबद्दल माध्यमांतून जे काही चालले होते त्यावर चर्चा झाली. खालच्या सभागृहातील काही सन्माननीय सदस्यांना निलंबनाची शिक्षा दिलेली आहे. पण त्याच बरोबर असे गैरकृत्य करणाऱ्या अधिकाऱ्यावरही निलंबनाची कारवाई व्हावी हा सर्वांचा आग्रह होता. ज्या सन्माननीय सदस्यांना निलंबित करण्यात आले त्यांना एकाच गुन्ह्यासाठी दोनदा शिक्षा कशासाठी असाही प्रश्न उपस्थित करण्यात आला.

सभापती महोदय, आज सभागृहात आल्यानंतर अशी माहिती मिळाली की, अटक झालेल्या सन्माननीय सदस्यांना कोर्टात हजर करण्याऐवजी व्हिडिओ कॉन्फरसिंगने त्यांची केस घेता आली असती. परंतु दबाव वाढल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष कोर्टात हजर करण्यात आले आणि त्या ठिकाणी माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते. विश्वस्त म्हणून काम करणाऱ्या लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे, त्यापेक्षा सुध्दा ज्या यंत्रणेवर हे सर्व करण्याची जबाबदारी आहे ती अधिक वरचढ होणार असेल तर हा दोन्ही सभागृहातील सदस्यांचा फार मोठा अवमान आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

आणि त्यांच्या भविष्याच्या प्रतिमेबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. त्यामुळे जोपर्यंत संबंधित अधिकाऱ्याचे निलंबन जाहीर होत नाही आणि जोपर्यंत या शिक्षेच्या संदर्भातील पुढील खुलासा होत नाही तोपर्यंत या सभागृहाचे कामकाज पुढे सुरु ठेवू नये या निर्णयाप्रत आम्ही सर्वजण आलेलो आहोत. कृपया आपण या बाबतचा निर्णय द्यावा.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची या बाबत एकच प्रतिक्रिया आहे. या बाबत मला माझ्या दालनामध्ये दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांबरोबर चर्चा केल्यानंतर योग्य तो निर्णय घेता येईल. सन्माननीय सदस्यांच्या भावना जाणून घेण्यासाठी मी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.26 वाजता 15 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आली.)

-------------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. विक्रम काळे )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.41 ते 12.56 वाजेपर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विक्रम काळे )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक मी अर्ध्या तासाकरिता तहकूब करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.56 ते 1.25 पर्यंत स्थगित झाली.)

-------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक दिवसभरासाठी स्थगित करण्यात येत आहे. सोमवार, दिनांक 25 मार्च 2013 रोजी सकाळी 10.00 ते 12.00 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक भरेल. या बैठकीत महाराष्ट्र विधानपरिषद नियम 260 अन्वये कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 26 मिनिटांनी, सोमवार,
दिनांक 25.3.2013 रोजीच्या सकाळी 10.00वाजेपर्यंत स्थगित झाली )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही